समता पतसंस्था
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
*नियम व अटी लागू
अहिल्यानगर : मार्केट यार्ड | प्रेमदान चौक | दिल्लीगेट
संपर्क : ७७२२ ०१० २२२
www.samatapat.com



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

चला स्विमिंग ला...

स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १७.०३.२०२६ | अंक नं. २८८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020




**Ilakshi Premia**
+91-8956755217, +91-8956755218

Plot No. 48, Near Sina Bridge, Nagar Pune Road,
Ahilyanagar - 414001.
premia.ilakshi.ahmednagar@heromotocorp.biz

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १७.०३.२०२६ | अंक नं. २८८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# परीक्षेच्या बंदोबस्तासाठी तैनात होमगार्डला चौघांकडून मारहाण

## भिंगार हायस्कूल परिसरातील घटना; चार अल्पवयीन मुलांवर गुन्हा दाखल

नगर - भिंगार येथील हायस्कूलमध्ये दहावीच्या पेपर बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या होमगार्डला चौघांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना १६ मार्च रोजी दुपारी घडली आहे. याबाबत महंमद गुफरान सादत गौडा (वय ३५, रा.मुलानगल्ली, भिंगार) या होमगार्डने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

होमगार्ड गौडा हे मागील १४ वर्षांपासून समादेशक कार्यालयात कार्यरत असून सध्या त्यांची नियुक्ती भिंगार हायस्कूल येथे परीक्षा बंदोबस्तासाठी होती. १६ मार्च रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास ४ अल्पवयीन मुले दोन दुचाकींवरून शाळेच्या परिसरात आले होते. विनाकारण थांबलेल्या या तरुणांना शिक्षकांनी विचारणा केली आणि होमगार्ड गौडा यांनी त्यांना गेटबाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

याचा राग धरून दोघांनी होमगार्ड गौडा यांची गचांडी धरली. त्यानंतर इतर दोघांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी व चापटीने मारहाण करत अश्लील शिवीगाळ केली. पेपर सुटल्यावर बाहेर ये, तुला बघून घेतो, अशी धमकीही यावेळी आरोपींनी दिली. याबाबत होमगार्ड गौडा यांच्या फिर्यादी वरून या चौघांच्या विरुद्ध मारहाण तसेच सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पोलिस ठाण्यासमोरच होमगार्डला हातपाय काढण्याची धमकी

दरम्यान होमगार्ड गौडा यांनी ४ मुलांच्या विरुद्ध दिलेल्या तक्रारी नंतर याच रागातून आरोपी मतिन खाजा सय्यद (रा.मुलानगल्ली, भिंगार) याने पोलीस ठाण्यासमोरच फिर्यादीला गाठले. तू आमच्या मुलांविरुद्ध गुन्हा कसा दाखल करतो? तुझी ड्युटी संपू दे, मग तुझे हातपाय काढतो, असे म्हणून त्याने भररस्त्यात धमकी दिली. सरकारी कामात व्यत्यय आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१ (२) (३) नुसार गुन्हा नोंदवला आहे. या घटनेमुळे पोलीस स्टेशन परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# अहिल्यानगर जिल्ह्यात १९ मार्चपर्यंत वादळी पाऊस; हवामान खात्याचा अंदाज

नगर - भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात १७ ते १९ मार्च या कालावधीत वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस व विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यासाठी १८ व १९ मार्च रोजी येलो अलर्ट जारी करण्यात आला असून, कोणत्याही प्रकारची जीवितहानी व वित्तहानी टाळण्यासाठी नागरिकांनी सुरक्षिततेची पुरेशी काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

वीज चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडांखाली, मोकळ्या मैदानात, विजेचे खांब व लोखंडी कुंपणाजवळ उभे राहू नये. वीज कोसळण्याची शक्यता असल्याने या काळात विजेच्या उपकरणांचा वापर टाळावा व ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे यांसारख्या सुवाहक वस्तूंपासून दूर राहावे. घराबाहेर मोकळ्या जागेत अडकल्यास गुडघ्यांवर बसून कान व डोके झाकून सुरक्षिततेची काळजी घ्यावी.

जाहिरात फलक कोसळून अपघात होण्याची शक्यता असल्याने त्याजवळ थांबणे टाळावे. धरणे, नद्या व कालव्यांच्या परिसरात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पाण्याच्या प्रवाहात उतरू नये व धोकादायक ठिकाणी फोटो काढणे टाळावे. शेतकऱ्यांनी वादळी वारा व पावसापासून शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी योग्य नियोजन करावे, तसेच काढणीस आलेला शेतमाल व जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नजीकचे पोलीस ठाणे, तहसील कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षाच्या १०७७ या टोल फ्री क्रमांकावर व ०२४१ - २३२३८४४ या दूरध्वनीवर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. गिते यांनी केले आहे.






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर महापालिकेचे १७१० कोटींचे अंदाजपत्रक स्थायी समितीकडे सादर; ४८१ कोटींचे उत्पन्न अपेक्षित

## १८ मार्च पासून तरतूद निहाय चर्चा

नगर - महानगरपालिकेचे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचे १७१० कोटी रुपयांचे मूळ अंदाजपत्रक १७ मार्च रोजी आयुक्त यशवंत डांगे यांनी स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांच्याकडे सुपूर्द केले. सभापती लोंढे यांनी सदस्यांना अभ्यासाला वेळ मिळावा, म्हणून सभा तहकूब केली असून, सभेचे पुढील कामकाज १८ मार्च रोजी दुपारी १ वाजेपासून सुरु होणार आहे. सभेत प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा होणार असून, त्यानंतर या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात येणार आहे.


महानगरपालिकेचे २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे बजेट स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे यांच्याकडे सादर करताना आयुक्त यशवंत डांगे. समवेत समितीचे सदस्य बाबासाहेब वाकळे, निखिल वारे, मनोज कोतकर आदी. (छाया - लहू दळवी)

स्थायी समितीच्या सभेसाठी आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, मुख्य लेखाधिकारी तथा उपायुक्त मेहेर लहारे, उपायुक्त शहाजहान तडवी, लेखापरीक्षक गणेश लयचेट्टी, लेखा विभागाचे अनिल लोंढे यांच्यासह स्थायी समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

महापालिका प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार ४८१ कोटी ०४ लाख रुपये महसुली उत्पन्न अपेक्षित असून भांडवली जमा ११६१ कोटी ४२ लाख रुपये गृहीत धरण्यात आली आहे. महसुली उत्पन्नात संकलीत करापोटी १०३ कोटी ८० लाख, संकलीत करावर आधारित करापोटी ८९ कोटी ७० लाख, जीएसटी अनुदान १५१ कोटी ९२ लाख, इतर महसुली अनुदान १७ कोटी २७ लाख, गाळा भाडे ३ कोटी ९३ लाख, पाणीपट्टी ३३ कोटी, मीटरद्वारे पाणीपुरवठा २० कोटी तसेच इतर उत्पन्न ४२ कोटी ३९ लाख रुपये अपेक्षित आहेत. भांडवली कामांसाठी अनुदान, कर्ज व महानगरपालिका हिस्सा मिळून ११६१ कोटी ४२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात विविध विभागांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यामध्ये वेतन, भत्ते व मानधनासाठी १६१ कोटी ९० लाख, पेन्शन व सेवा उपदानासाठी ७१ कोटी ५० लाख, पाणीपुरवठा वीज बिलासाठी ४५ कोटी, स्ट्रीट लाईट वीज बिलासाठी ८ कोटी तर शिक्षण विभागासाठी ६ कोटी ५० लाखांची तरतूद आहे. महिला व बालकल्याण योजनांसाठी २ कोटी ५५ लाख, अपंग पुनर्वसन योजनांसाठी २ कोटी ५५ लाख, मागासवर्गीय कल्याणकारी योजनांसाठी ८ कोटी ४१ लाख, कचरा संकलन व वाहतुकीसाठी २० कोटी तसेच सदस्य प्रभाग स्वेच्छानिधीसाठी ९ कोटी ६२ लाख निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. शहरातील मूलभूत सुविधांवर भर देत नवीन रस्त्यांसाठी १ कोटी ५० लाख, रस्ते दुरुस्तीसाठी १ कोटी ५० लाख, पाणीपुरवठा दुरुस्तीसाठी १ कोटी २५ लाख, टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी २ कोटी ७५ लाख, अशुद्ध पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ५ कोटी तसेच अग्निशमन वाहन खरेदीसाठी ३ कोटी असा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. याशिवाय ओढे-नाले साफसफाईसाठी ५५ लाख, आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ५० लाख, वृक्षारोपणासाठी १ कोटी, हिवताप प्रतिबंधक योजनेसाठी ६० लाख, कचरा डेपो सुधारणेसाठी १ कोटी, मोकाट प्राणी नियंत्रणासाठी १ कोटी ४० लाख आणि मालमत्ता सर्वेक्षणासाठी १० कोटी यांसारख्या कामांनाही प्राधान्य देण्यात आले आहे.

### नेहरू मार्केसाठी ८ कोटी मंजूर

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, सीना नदी खोलीकरण व रुंदीकरणासाठी २० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून बाबर मळा ते लोखंडी पुलापर्यंत हे काम सुरू होणार आहे. याचबरोबर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत काटवन खंडोबा येथे ५०४ घरकुल योजनेचे अपार्टमेंट बांधण्यात येणार असून एका घराची किंमत १३ लक्ष ४५ हजार रुपये आहे. यामध्ये अडीच लाख रुपये शासनाकडून अनुदान मिळणार आहे. शहरामध्ये ई-बस सेवा सुरू करण्यासाठी १२ कोटी ४५ लाख रुपये मंजूर झाले आहेत. यातून एकूण ४० बस शहरात धावणार असून पहिल्या टप्प्यात दहा बस सुरू होणार आहे. कचरा डेपो येथे स्वच्छ भारत अभियानामधून शेड बांधण्यासाठी सात कोटी ५८ लाख रुपये मंजूर झाले आहे. नेहरू मार्केट बांधण्यासाठी आठ कोटी नऊ लाख रुपये मंजूर झाले आहे. रंगभवन येथे २८ कोटी रुपये खर्चून शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार करण्यात येणार असून ३८ दुकाने व पार्किंगची सुविधा तयार करण्यात येणार आहे. यामध्ये ३८० गाड्यांची पार्किंग व्यवस्था असणार आहे. प्रोफेसर कॉलनी येथे बीओटी तत्त्वावर शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार करण्यात येणार असून सुमारे ३५ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. यामध्ये ९६ गाळे बांधण्यात येणार आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी साडेचारशे कोटी व भूमिगत गटार योजनेसाठी ६०० कोटी रुपये मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे, असे त्यांनी सांगितले.

## चार गोळ्या लागलेल्या सागर मोहळकरचा उपचारादरम्यान ससून रुग्णालयात मृत्यू



जामखेड - जामखेड येथील नुरानी कॉलनीत झालेल्या गोळीबारात ७ पैकी ४ गोळ्या अंगात लागलेल्या पैलवान सागर किसन मोहळकर (वय ३०) याचा अखेर १२ दिवसांच्या उपचारानंतर पुण्यातील ससून रुग्णालयात मृत्यू झाला. सोमवारी (दि. १६) सायंकाळी साडेसातच्या सुमारास वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मृत घोषित केले.

४ मार्च रोजी रात्री जामखेड शहरातील तपनेश्वर रोड ते खाडेनगर मार्गावरील नुरानी कॉलनीत मोटारसायकलवर आलेल्या अज्ञात आरोपींनी सागर मोहळकरवर गावठी कट्ट्यातून गोळीबार केला होता. या हल्ल्यात त्याला चार गोळ्या लागल्या होत्या. गंभीर अवस्थेत त्याला तातडीने पुण्यातील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान सागर मोहळकरचे वडील किसन मोहळकर यांच्या फिर्यादीवरुन जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जामखेड पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अभिमन्यु महादेव पोते (वय २४, रा. भुतवडा रोड, लाईट बोर्ड शेजारी, जामखेड) याला अटक केली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी याच प्रकरणात रोहित विठ्ठल आखाडे याला अटक केली. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस तपासात सागर मोहळकरचा गुन्हेगारी इतिहास समोर आला आहे. त्याच्यावर यापूर्वी खुनाचे दोन गुन्हे दाखल होते. एका खून प्रकरणात त्याला अटक होऊन तुरुंगवासही झाला होता. धक्कादायक बाब म्हणजे, तुरुंगात असतानाही त्याने एका सहकैद्याचा खून केल्याची माहिती समोर आली आहे. काही महिन्यांपूर्वीच तो जामिनावर सुटून आला होता.

सागर मोहळकर हा एकेकाळी नामवंत पैलवान म्हणून ओळखला जात होता. अनेक आखाड्यांमध्ये त्याने मानाच्या कुस्त्या केल्या होत्या. मात्र, नंतर तो नशेच्या आहारी गेल्याने गुन्हेगारीकडे वळल्याचे सांगितले जाते. खंडणी, मारहाण, जीवघेणे हल्ले अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये त्याचे नाव वारंवार पुढे आले. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील एका कुस्ती स्पर्धेत त्याने निलेश घायवळ याला मारहाण केल्याचीही घटना घडली होती.

### 'गजनी'सारखी सवय; तळहातावर लिहायचा नावे

काही काळापासून तो विस्मरणाच्या समस्येने त्रस्त असल्याचे सांगितले जाते. 'गजनी' सारखी चित्रपटातील पात्राप्रमाणे तो तळहातावर नावे लिहून लोकांची ओळख ठेवत असे. गोळीबाराच्या वेळीही त्याच्या तळहातावर तीन नावे लिहिलेली आढळली असून ती आरोपींची आहेत का, याचा तपास पोलीस करत आहेत.

## जागेच्या वादातून दरेवाडी येथे दोन गटांत हाणामारी

### ७ जण जखमी, दोन्ही गटाच्या १० जणांवर गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील दरेवाडी येथील बडेकर वस्ती भागात जागेच्या वादातून दोन गटांत झालेल्या हाणामारीत सात जण जखमी झाले आहेत. या प्रकरणी परस्परविरोधी फिर्यादींवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन्ही गटांतील १० जणांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरेवाडी परिसरातील बडेकर वस्ती येथे जागेच्या मालकीवरून दोन गटांत काही दिवसांपासून वाद सुरू होता. हा वाद १२ मार्च रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास विकोपाला गेला. यावेळी दोन्ही गटातील काही जण एकमेकांसमोर येत शिवीगाळ व दमदाटी करू लागले. त्यानंतर वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या हाणामारीत दोन्ही गटाचे सात जण जखमी झाले आहेत.

प्रतिज्ञा विश्वातस बडेकर (वय २८) यांच्या जबाबावरून सिध्दार्थ बन्सी बडेकर, शितल संदीप गायकवाड (दोघे रा. बडेकर वस्ती, दरेवाडी), निकीता वैभव भिंगारदिवे, वैभव मार्शल भिंगारदिवे (दोघे रा. सावेडी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपींनी लाकडी दांडक्याने केलेल्या हल्लयात फिर्यादी प्रतिज्ञा बडेकर, विश्वाधस बडेकर, अतुल बडेकर, संजय बडेकर हे जखमी झाले आहेत. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस अंमलदार एन. एम. पठारे करीत आहेत.

शांताबाई सिताराम बडेकर (वय ७५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विश्वावस माणिक बडेकर, प्रतिज्ञा विश्वोस बडेकर, आतुल संजय बडेकर, आशा संजय बडेकर, संदीप सोनवणे, बंटी संदीप सोनवणे (सर्व रा. बडेकर वस्ती, दरेवाडी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपींनी केलेल्या मारहाणीत फिर्यादी शांताबाई बडेकर, मृलाण बडेकर व जितेंद्र देठे हे जखमी झाले आहेत.

## प्रसाद हराळ यांना महाकुंभ सेवा मेडल बहाल



नगर - अरणगाव, मेहेराबाद येथील, अरणगाव भूषण व अरणगाव रत्न पुरस्काराने सन्मानित प्रसाद प्रताप हराळ, सिमा सुरक्षा बल यांना नुकतेच महाकुंभ प्रयागराज २०२५ येथिल उत्कृष्ट सेवा कार्याबाबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचेकडुन महाकुंभ सेवा मेडल बहाल करण्यात आले.

यापुर्वी त्यांनी त्यांच्या सेवा काळात, सिलिगुडी, तसेच जम्मु, काश्मिर येथिल-रामबन, नौशेरा, मध्य प्रदेश येथिल-टेकनपुर, ओरीसा येथिल -मलखनगिरी, कर्नाटक येथे इलेक्शन ड्युटी, राजस्थान बार्डर, इत्यादि अनेक ठिकाणी ड्युटी बजावली असुन गत वर्षी २०२५ ला प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात त्यांना देश सेवा करण्याची संधी मिळाली होती. तेथे त्यांनी १ वर्षे प्रशंसनीय कामगिरी केली होती.याची दखल घेऊन त्यांना मेडल प्राप्त झाले आहे.

सेवा काळात अतिरिक्त वेळेत त्यांना काष्ठ शिल्प बनविण्याचा छंद असुन अनेक प्रशंसनीय काष्ठ शिल्प त्यांनी बनवले आहेत. सध्या ते आगामी सेवाकार्या साठी मेघालय येथे कामावर रुजु झाले आहेत.

## ब्रिजमोहन बक्षी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सिव्हील हडको येथील साधु वासवानी सोसायटीतील रहिवासी ब्रिमोहन परमानंद बक्षी (वय ७७) यांचे १७ मार्च रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, ३ भाऊ, भावजया, १ मुलगा, सुन, नातवंडे, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे. छत्रपती संभाजीनगर रोड वरील रिलायन्स पेट्रोल पंप व एमआयडीसीतील ब्रिज इंडस्ट्रीज व क्राऊन कोटींगचे ते संचालक होत. उद्योजक सागर बक्षी यांचे ते वडील होत.

## सुभाष दांगट यांचे हृदयविकाराने निधन



नगर - काष्टी येथील रहिवासी सुभाष साहेबराव दांगट (वय ५५) यांच १६ मार्च रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर काष्टी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, पत्नी, १ मुलगी, ३ भाऊ, भावजय, पुतणे, पुतण्य, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सौ. संगीता गदिया यांचे संभाराव्रतात निधन



श्रीरामपूर - येथील सौ.संगीता राधेशाम गदिया (वय ५७) यांचे संभाराव्रतात दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दिर, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रेल्वे स्टेशन शेजारील राधेश्याम ट्रेडर्स आणि गदिया कोल्ड स्टोरेजचे मालक राधेशाम शांतीलाल गदिया यांच्या पत्नी, तुषार (बंटी) व चेतन गदिया यांच्या मातोश्री, संतोष गदिया यांच्या भावजई, चि.निल, मित व खुशी गदिया यांच्या आजी होत.

## शिक्षण आयुक्तांच्या सकारात्मक आश्वासनानंतरही यंत्रणा ढिम्म; २५ मार्चची 'डेडलाईन', अन्यथा शिक्षणमंत्र्यांच्या बंगल्यावर धडक

### शिक्षण आयुक्तालयावर शिक्षकांचा 'प्रचंड आक्रोश'; पुण्याचे रस्ते जाम, आता २७ मार्चला 'मालेगाव' पेटणार

नगर - गेल्या तीन वर्षांपासून हक्काच्या वेतनासाठी वणवण भटकणाऱ्या शिक्षकांनी १६ मार्च रोजी पुणे येथील शिक्षण आयुक्तालयावर 'प्रचंड आक्रोश आंदोलन' करून प्रशासनाचे वाभाडे काढले. हजारो शिक्षकांच्या उपस्थितीमुळे आयुक्तालय परिसर दणाणून गेला होता. या आंदोलनाची गंभीर दखल घेत शिक्षण आयुक्त संचिन्द्र प्रताप सिंह यांनी शिक्षक भारतीच्या शिष्टमंडळाशी सकारात्मक चर्चा केली व थकीत वेतन देण्याचे आश्वासन दिले. मात्र, आयुक्त सकारात्मक असले तरी शिक्षण संचालक कार्यालय आणि खालची प्रशासकीय यंत्रणा अद्यापही 'तांत्रिक' कारणांच्या नावाखाली बिलांची टाळाटाळ करत आहे. या पार्श्वभूमीवर, जर २५ मार्च पर्यंत वेतन मिळाले नाही, तर २७ मार्चला शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव येथील निवासस्थानावर (बंगल्यावर) अभूतपूर्व धडक देण्याचा इशारा शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी दिला आहे.


२५ मार्च पर्यंत वेतन मिळाले नाही, तर २७ मार्चला शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव येथील निवासस्थानावर अभूतपूर्व धडक देण्याचा इशारा शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी दिला आहे.

### संचालक कार्यालयाची 'संशयास्पद' भूमिका!

मागील वर्षी बिलांना उशीर झाल्याचे लंगडे समर्थन देऊन शिक्षण संचालक कार्यालय ही देयके मंजूर होतील की नाही, अशी संदिग्धता व्यक्त करत आहे. ही भूमिका म्हणजे थेट उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान (Contempt of Court) आहे. आम्ही भीक मागत नाही, तर आमच्या हक्काचा पगार मागत आहोत. कलम ३००-अ नुसार वेतन हा आमचा मूलभूत अधिकार आहे, अशा शब्दात प्रा. पाडेकर यांनी प्रशासकीय दिरंगाईचा निषेध केला.

### अहिल्यानगर, पुणे आणि धुळे जिल्ह्यांचा संयम सुटला!

विशेषतः अहिल्यानगर (नगर), पुणे आणि धुळे जिल्ह्यातील शिक्षकांची शेकडो बिले गेल्या तीन वर्षांपासून धूळ खात पडली आहेत. १६ मार्चच्या आंदोलनात या तिन्ही जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला संताप व्यक्त केला. आयुक्तांच्या आश्वासनानंतर आता चेंडू प्रशासनाच्या कोर्टात असून, २५ मार्चपर्यंत ही सर्व बिले ऑनलाइन प्रणालीद्वारे मंजूर न झाल्यास होणाऱ्या परिणामांना प्रशासनच जबाबदार असेल.

### यांच्या उपस्थितीत झाला एल्गार

पुणे येथील आंदोलनात पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर, विनाअनुदान विरोधी कृती समितीच्या राज्य महिला अध्यक्षा प्रा. रुपालीताई कुरुमकर, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष प्रा. रामराव काळे, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, विजय पांडे, संतोष नवले, अमोल तळेकर, शिरूर तालुकाध्यक्ष चंद्रकांत भोजने, सोपान कोरडे, रामदास मुर्तडक, अमित सहाणे, संदीप महाडदेव, दीपक बाळसारफ, विकास आवारी, मुख्याध्यापक सचिन वाकचौरे, प्राचार्य सुनील धुमाळ, के.डी. आभाळे, प्रभाकर गावंडे, जगन्नाथ मुर्तडक, मच्छिंद्र नवले, घनश्याम नवले यांच्यासह शेकडो पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

### प्रशासनाला दिलेला अंतिम इशारा

१. २५ मार्च २०२६ : ही थकीत वेतन खात्यात जमा करण्याची अंतिम मुदत आहे.

२. न्यायालयीन अवमान : मुदतीत काम न झाल्यास दोषी अधिकाऱ्यांच्या विरोधात वैयक्तिकरित्या उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल.

३. मालेगाव धडक : २५ तारखेपर्यंत तोडगा न निघाल्यास २७ मार्चला मालेगावात 'शिक्षक भारती'चा महा-आक्रोश पाहायला मिळेल.



## हनुमान चालिसा पाठ

**बुधवार दि. १८/३/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**सप्तश्रृंगी सामाजिक सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ,** प्रोफेसर चौक, समर्थ शाळे समोर, पंकज राठोड ९८५०४२७८८८

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**माणिकनगरचा राजा मित्र मंडळ,** मयुर हॉटेल जवळ, गुंजाळ हॉस्पिटल शेजारी, साईप्रेम बंगला, नगर-पुणे रोड, सुमीत वर्मा ९८६०५२१०२२

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**

**मुकेश अरोरा एवम् परिवार,** रामकृष्ण सारडा वसतीगृहाच्यासमोर, सिव्हील हडको ९८९००५००४०

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**शांती ऑडीओ मित्र मंडळ,** ढोरे परिवार, नेहरू मार्केट, चितळे रोड

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**शुभम मिरांडे, पवन जाजू,** श्री सिद्धीविनायक तरुण मंडळ, काळुबागवान गल्ली, अ.नगर ९२६०००७९७९

## भारतीय बाजारात सोने आणि चांदीच्या दरात पुन्हा झाली वाढ


नवी दिल्ली - सोने आणि चांदीच्या दरात १७ मार्च रोजी वाढ झाली आहे. इंडिया बुलियन ॲण्ड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव ३०० रुपयांनी वाढून १.५६ लाख रुपयांवर पोहोचला आहे. एक किलो चांदी ५ हजार रुपयांनी वाढून २.५४ लाख रुपयांवर पोहोचली आहे.

तज्ज्ञांनुसार, २९ जानेवारी रोजी सोन्याची किंमत १.७६ लाख रुपये आणि चांदीचा दर ३.८६ लाख रुपये या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचला होता. त्यानंतर त्यांच्या किमतीत बरीच घसरण झाली आहे. त्यामुळे त्यांची खरेदी होताना दिसत आहे. या वर्षी सोने-चांदीच्या किमतीत वाढ दिसून आली आहे. गेल्या वर्षाच्या अखेरीस सोने १.३३ लाख रुपये प्रति १० ग्रॅम होते, जे आता १.५६ लाख रुपयांवर आहे. म्हणजेच, या वर्षी आतापर्यंत त्याची किंमत २३ हजार रुपयांनी वाढली आहे. तर चांदीही याच काळात २४ हजार रुपयांनी महाग झाली आहे.

अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील युद्ध तिसऱ्या आठवड्यात प्रवेश करत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत तेल पुरवठा खंडित झाल्याच्या वृत्तांमुळे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याची मागणी वाढली आहे. कच्च्या तेलाच्या किमती १०४ डॉलर ओलांडल्याने जागतिक चलनवाढ वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिणामी, यूएस फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरात कपात होण्याची शक्यता कमी झाली आहे, ज्यामुळे सोन्याच्या किमतींवर दबाव निर्माण झाला आहे. डॉलर निर्देशांकात ०.६% घसरण झाल्याने सोन्याच्या किमती कमी झाल्या आहेत, ज्यामुळे किमती ५,००० डॉलरच्या वर टिकून राहिल्या आहेत.

तज्ञांनुसार, विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर सोने सध्या 'करेक्शन फेज' (किमतींमध्ये सुधारणा) मध्ये आहे. अल्प मुदतीत गती थोडी कमी झाली असली तरी, दीर्घ मुदतीत तेजीचा कल कायम आहे. अशा परिस्थितीत, गुंतवणूकदार सोन्यात थोड्या-थोड्या प्रमाणात गुंतवणूक करू शकतात.

## श्रीराम मंदिरात १९ ते २६ मार्चपर्यंत 'श्रीरामनवमी उत्सवा'चे आयोजन



नगर - समर्थ सदगुरू श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या कृपाशिर्वादाने, नेप्ती येथे श्रीराम मंदिरात १९ ते २६ मार्च दरम्यान रोजी श्रीरामनवमी उत्सवाचे आयोजन केले आहे. सकाळी ६ ते ७ काकड आरती, ८ ते ९ नाशिक लक्ष्मीकांत जोशी यांचे श्री महाराजांची आश्वासने या विषयावर प्रवचन सेवा, ९. ३० ते १२. ३० पुण्याच्या निलाताई अभ्यंकर यांचे दासबोध पारायण. दुपारी १२.३० पादसेवन, आरती व महाप्रसाद. दुपारी २ ते ५. ३० भजन व गायनसेवा, किर्तन सेवा, सायं. ५.३० ते ६.३० नित्योपासना, ६.३० ते ८ पुण्याच्या परमपूज्य नीलाताई अभ्यंकर यांचे रामायणातील व्यक्ती रेखा या विषयावर प्रवचन सेवा होणार आहे. रात्री ८ वा. आरती व महाप्रसाद.

१९ ते २६ मार्च रोजी दुपारी २ ते ५.३० वाजेपर्यत भजन, गायन सेवा १९ मार्च रोजी दुपारी गीता परीवार वतीने संपूर्ण गीता पठण, २० मार्च रोजी अंबिका भजनी मंडळ व पुण्याचे स्वर गंधार भजनी मंडळाचे भजन व सौ. अपर्णा बालटे यांचे गायन, २१ मार्च स्वर मंदिर भजनी मंडळाचे भजन व ओंकार देऊळगावकर यांचे गायन, नाशिकचे समर्थ भक्त निनाद कुलकर्णी यांची रामदासी किर्तन, २२ मार्च रोजी सप्तसूर भजनी मंडळ व पुणे, नांदेड सिटीचे श्रीराम चैतन्योपासना मंडळ भजन व नाम शिबिर व ह.भ. प. सविता मुळे यांचे नारदीय किर्तन २३ मार्च संपदा चौधरी गायन, गुरूछाया भजनी मंडळाचे भजन, किशोर जोशी यांचे गायन, २४ मार्च रोजी डॉ. सौ. किर्ती गंधे व सौ. उज्वला जोशी यांचे गायन, ह.भप. महेश कस्तुरे यांची नारदीय किर्तन, २५ मार्च रोजी वेदांत कुलकर्णी गायन व सौ. अनुजा कुलकर्णी, २६ मार्च रोजी महेश काळे स्कूल ऑफ म्युझिकचे कलाकार २६ मार्च रोजी रामनवमी सोहळयात श्री रामरायांना लघुरूद्र महापूजा, पालखी सोहळा, फुलगाव आश्रमाचे परमपूज्य स्वामी स्वरूपानंद यांचे आशीर्वाचन. दुपारी १२ वाजता श्रीराम जन्म पाळणा, त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी ५ ते ८ वाजता श्री गुरूमाउली संगीत विदयालय प्रस्तुत आज अयोध्या सजली हा कार्यक्रम होणार आहे. अशी माहीती डॉ. सी. बी. कुलकर्णी (विश्वस्त) यांनी दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेचे अहिल्यानगरमध्ये 'एक दिवशीय अन्नत्याग आंदोलन'

नगर – मुंबईच्या आझाद मैदानावर कला शिक्षक भरतीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अहिल्यानगर येथील स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या वतीने एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष यशवंत तोडमल यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक येथे हे आंदोलन पार पडले.



मुंबईच्या आझाद मैदानावर कला शिक्षक भरतीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अहिल्यानगर येथील स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष यशवंत तोडमल यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक येथे एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले.

यावेळी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत राज्य शासनाकडून कला शिक्षकांची भरती तात्काळ करण्यात यावी, अशी मागणी केली. मागील जवळपास पंधरा वर्षांपासून राज्य सरकारकडून कला शिक्षकांची भरती करण्यात आलेली नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. केंद्रीय शिक्षा अभियानांतर्गत प्रत्येक शाळेत कलाशिक्षक असणे हा विद्यार्थ्यांचा मूलभूत अधिकार असताना, राज्य शासनाकडून या बाबतीत उदासीनता दिसून येत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. यंदाच्या शिक्षक अभियोग्यता चाचणीत राज्यातील हजारो कला शिक्षकांनी सहभाग घेतला असून संच मान्यता प्रक्रिया देखील सुरू आहे. मात्र या प्रक्रियेत कला शिक्षकांचा विचार न झाल्याने १२ मार्चपासून हजारो शिक्षक मुंबईच्या आझाद मैदानावर धरणे आंदोलन करत आहेत. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अहिल्यानगरमधील विद्यार्थ्यांनीही पुढाकार घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलनाकडे राज्य सरकारने पाठ फिरवल्याचा आरोप करत, तातडीने कला शिक्षकांची भरती करावी, अशी मागणी स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेच्या वतीने करण्यात आली. तसेच महाराष्ट्राची कला उडवणाऱ्या सरकारचा निषेध नोंदवण्यासाठी प्रतीकात्मक होडी पाण्यात बुडवण्यात आली. शासनाच्या धोरणानुसार अडीचशे विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा शिक्षक पद मंजूर असताना, कला शिक्षकांसाठी ५०० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक अशी अट ठेवण्यात आली आहे. ही अन्यायकारक व जाचक अट तात्काळ रद्द करावी तसेच कला शिक्षकांची बिंदू नामावली तात्काळ जाहीर करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

राज्य शासनाकडून अनावश्यक प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर केला जातो. शेतकऱ्यांची इच्छा नसतानाही शक्तीपीठ महामार्गासाठी सरकार आग्रही आहे, मात्र दुसरीकडे शिक्षकांची गरज असताना शिक्षण विभागासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जात नाही, ही दुर्दैवी बाब असल्याचे स्माईलींग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष यशवंत तोडमल यांनी यावेळी स्पष्ट केले.

# पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे लोकअदालतीत ठेवावीत

## प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आशिष पाटील यांचे आवाहन

नगर – दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रकरणे अल्पावधीत निकाली निघण्यासाठी पक्षकारांनी जास्तीत जास्त प्रकरणे लोकअदालतीत ठेवावीत. तसेच तडजोडपात्र प्रकरणांमध्ये सकारात्मक भूमिका घेऊन सामंजस्याने तोडगा काढावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आशिष म. पाटील यांनी केले.



राष्ट्रीय लोकअदालतीत बोलताना प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आशिष पाटील.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बार असोसिएशन व सेंट्रल बार असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन जिल्हा न्यायालय तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये करण्यात आले. राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन पक्षकारांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आले.

यावेळी जिल्हा न्यायाधीश–३ एम. एच. शेख, पोलीस उपअधीक्षक श्री. देशमुख, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश सु. पैठणकर, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, बार असोसिएशनचे अध्यक्ष कृष्णा झावरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव योगेश सु. पैठणकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. जिल्हा न्यायालयातील न्यायिक अधिकारी श्रीमती जे. डी. उपरकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व शेवटी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास न्यायिक अधिकारी, जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक, विधिज्ञ तसेच पक्षकार उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य १७ वर्षाखालील मुलींच्या बुद्धिबळ निवड स्पर्धेमध्ये अहिल्यानगरच्या तनिष्का मेहेत्रेचे यश मिळविल्याबद्दल तिला पारितोषिक डॉ. सुरेश रावते यांच्या हस्ते देण्यात आले.

# महाराष्ट्र राज्य १७ वर्षाखालील मुलींच्या बुद्धिबळ निवड स्पर्धेमध्ये अहिल्यानगर येथील तनिष्का मेहेत्रे हिचे यश

नगर – नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य १७ वर्ष मुलींच्या निवड बुद्धिबळ स्पर्धेमध्ये अहिल्यानगरची कु.तनिष्का मेहेत्रे हिने उत्कृष्ट कामगिरी करत ८ पैकी ६ डावांमध्ये विजय मिळवला आणि स्पर्धेमध्ये ५ वा क्रमांक प्राप्त केला व रोख १५०० रुपये पारितोषिक पटकाविले.

या स्पर्धेमध्ये राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, सांगली, जळगाव तसेच इतर अनेक जिल्ह्यांमधून निवड झालेल्या बुद्धिबळ खेळाडूंचे सहभाग होता. कुमारी तनिष्का हिची अहिल्यानगर जिल्ह्यातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. महाराष्ट्र चेस असोसिएशनतर्फे होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा या अत्यंत चुरशीच्या व प्रतिष्ठेच्या मानल्या जातात. तनिष्का हिला बुद्धिबळ प्रशिक्षक प्रकाश गुजराथी तसेच विशाल गुजराथी यांचे मार्गदर्शन व आई–वडिलांचे प्रोत्साहन मिळाले.

तिच्या या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट तसेच अनेक खेळाडू पालक यांनी तिचे अभिनंदन केले आहे

कु. तनिष्का मेहेत्रे हीस पारितोषिक डॉ. सुरेश रावते यांच्या हस्ते देण्यात आले. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण ठाकरे आणि स्पर्धा संचालक अमरीश जोशी व इतर उपस्थित होते.

# भक्ती, नामस्मरण आणि संत परंपरेतच समाजाचे खरे कल्याण

## ह.भ.प. गुलाब महाराज खालकर यांचे प्रतिपादन, नेप्ती येथील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिराच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक सोहळ्याला प्रतिसाद

नगर – नेप्ती येथील नंदनवन फार्म परिसरातील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिराच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक सोहळ्याला भाविकांचा प्रतिसाद लाभला आहे. या कार्यक्रमाची सुरुवात १४ मार्च रोजी हभप संजय महाराज महापुरे यांच्या कीर्तनाने झाली. १५ मार्च रोजी हभप स्वामी अमृतानंद सरस्वती माताजी यांचे कीर्तन झाले. १६ मार्च रोजी सकाळी काल्याचे कीर्तन ह.भ.प. गुलाब महाराज खालकर (आर्वी) यांच्या वाणीने झाले. काल्याची दहीहंडी फोडण्यात आली त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



नेप्ती येथील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिराच्या बाराव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित धार्मिक सोहळ्याला भाविकांचा प्रतिसाद मिळाला. यावेळी काल्याचे कीर्तन हभप गुलाब महाराज खालकर यांचे झाले

या कीर्तन प्रसंगी बोलताना ह.भ.प. गुलाब महाराज खालकर म्हणाले की, संतांच्या विचारातूनच समाजाला योग्य दिशा मिळते. नामस्मरण, कीर्तन आणि सत्संग यामुळे माणसाचे मन शुद्ध होते व समाजात सद्भावना निर्माण होते. त्यांनी पुढे सांगितले की, धर्म म्हणजे केवळ विधी नसून तो आचरणात आणला तरच त्याचे खरे महत्त्व समजते. संतांनी दिलेला भक्तीचा मार्गच समाजाला एकत्र आणणारा आहे. त्यांच्या प्रभावी कीर्तनामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

या धार्मिक सोहळ्याला झुबर महाराज आव्हाड, रामदास महाराज क्षीरसागर, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, नगरसेवक संजय शेंडगे, श्याम नळकांडे, सुरेश तिवारी, दगडू पवार, सचिन शिंदे, सुजाता पडोळे, गोरख पडोळे, नितीन पुंड, बाळासाहेब आगरकर, विशाल पटवेकर, संतोष गेनप्पा, जालिंदर बोरुडे, मीनाताई सत्रे, गणेश फुलसौंदर यांची उपस्थिती होती. उपस्थितांनी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनात जाधव परिवाराचे विशेष योगदान लाभले. यामध्ये सुरेश भाऊसाहेब जाधव, हेमंत जाधव, दत्ता जाधव, बाबासाहेब जाधव, राज जाधव, संजय जाधव, डॉ. अमोल जाधव, डॉ. सौ. प्राजक्ता जाधव, सुवर्णा दत्ता जाधव, नरेंद्र सत्रे, कावेरो सत्रे आदींनी सहभाग घेतला.

कीर्तनसाथ म्हणून हरिहर वारकरी शिक्षण संस्था, निंबळक यांचे सहकार्य लाभले असून ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज डांगरे व ह.भ.प. रामदास महाराज क्षिरसागर यांनी कीर्तनसाथ दिली.

नर्मदेश्वर मित्र मंडळ, नेप्ती, समस्त ग्रामस्थ तसेच नंदनवन मित्र मंडळ यांच्या वतीने हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तसेच वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठान (ट्रस्ट) पायी दिंडी सोहळा मार्केटयार्ड, अ.नगर आणि शिरुभाऊ लोमटे यांचे सहकार्य लाभले. नंदनवन फार्म, नगर–कल्याण रोड, छत्रपती कॉलेज समोर, नर्मदेश्वर मंदिर, नेप्ती येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून भक्तीमय वातावरण अनुभवले. राजेंद्र एकाडे, छबूनाना जाधव, तबाजी होळकर, ॲड. विजय लुने, अशोक आगरकर, अजय कविटकर, देवा होले, प्रकाश इवले, सुभाष राऊत, रमेश चिपाडे, अंबादास पुंड आदी उपस्थित होते.

यावेळी मच्छिंद्र महाराज भोसले, प्रदीप महाराज जाधव, नरसिह पटेल, सचिन सत्रे, पुरुषोत्तम पटेल, पारुनाथ ढोकळे, वेजूनाथ लोखंडे, बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे आदींसह नेप्ती भजनी मंडळ, वीर हनुमान पायी दिंडी सोहळा चे सर्व सदस्य, श्रीराम भक्त सत्संग मंडळाचे सदस्य उपस्थित होते. प्रास्तविक हभप बाबासाहेब जाधव यांनी केले. सुरेश जाधव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन पुंड सर यांनी केले.

# सरुबाईच्या अंधकारमय जीवनाला फिनिक्समुळे मिळाली नवदृष्टी

## रेटिनाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वी

नगर – आयुष्यातील दीर्घकाळ अंधार अनुभवलेल्या एका ज्येष्ठ महिलेच्या जीवनात पुन्हा प्रकाश फुलवण्याचे मोलाचे कार्य फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून घडले आहे. २० वर्षांपूर्वी झालेल्या अपघातात एका डोळ्याची दृष्टी गमावलेली आणि दुसऱ्या डोळ्यात काही वर्षांपासून गंभीर दृष्टीदोष निर्माण झाल्यामुळे पूर्णपणे अंधत्व आलेल्या पाटोदा (ता. आष्टी, जि. बीड) येथील ७१ वर्षीय सरुबाई कांबळे यांच्यावर रेटिनाची अवघड शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्यात आली.



पाटोदा (ता. आष्टी, जि. बीड) येथील सरुबाई कांबळे यांच्यावर रेटिनाची अवघड शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा दृष्टी मिळवून देण्यात आली.

बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त पाटोदा गावातील सरुबाई कांबळे या साध्या कुटुंबातील आहेत. सुमारे २० वर्षांपूर्वी झालेल्या अपघातात त्यांचा एक डोळा कायमचा गमावला गेला होता. दुसऱ्या डोळ्यालाही काही वर्षांपासून गंभीर दृष्टीदोष निर्माण झाला. परिणामी दोन्ही डोळ्यांनी दिसेनासे झाल्यामुळे त्यांचे जीवन पूर्णपणे अंधारमय झाले होते. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने डोळ्यांवर होणारी महागडी आणि अवघड शस्त्रक्रिया करणे त्यांच्या कुटुंबासाठी शक्य नव्हते. रेटिनाशी संबंधित शस्त्रक्रिया जटिल आणि खर्चिक असल्याने अनेक डॉक्टरांनी मोठा खर्च करावा लागेल आणि दृष्टी परत येईल याची खात्री देता येणार नाही, असे सांगितले होते. त्यामुळे कांबळे कुटुंब मोठ्या अडचणीत सापडले होते.



दरम्यान, नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराची माहिती त्यांना मिळाली. या शिबिरात सरुबाई कांबळे सहभागी झाल्या आणि त्यांनी फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांची भेट घेऊन आपली संपूर्ण परिस्थिती सांगितली.

बोरुडे यांनी त्यांच्या अडचणीची गांभीर्याने दखल घेत तात्काळ वैद्यकीय तज्ज्ञांशी संपर्क साधला आणि पुढील उपचारासाठी त्यांना पुणे येथील के. के. आय बुधराणी हॉस्पिटलमध्ये पाठविण्याची व्यवस्था केली. पुण्यातील तज्ज्ञ डॉक्टरांनी कांबळे यांच्या डोळ्याची तपासणी करून एका डोळ्यावर रेटिनाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केली. या शस्त्रक्रियेमुळे त्यांच्या जीवनातील दीर्घकाळचा अंधकार दूर झाला आणि त्यांना पुन्हा दृष्टी मिळाली.

शस्त्रक्रियेनंतर कांबळे नगर शहरात परतल्यानंतर जालिंदर बोरुडे त्यांचे स्वागत करण्यासाठी आले होते. त्या वेळी भावुक झालेल्या कांबळे यांनी बोरुडे यांना कवटाळून घेतले आणि डोक्यावर हात ठेवून मायेने आशीर्वाद दिले. या भावनिक क्षणाने उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.



ब्लु डायमंड स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा झाला.

# ब्लु डायमंड स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात

नगर – ब्ल्यू डायमंड अकॅडमीमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्या बालरोगतज्ञ डॉ.पल्लवी तोडमल उपस्थित होत्या. उपप्राचार्या शारदा शेळके यांनी प्रास्ताविकात महिला दिनाचे औचित्य साधून विद्यार्थिनी व महिलासाठी डॉक्टरांचे व्याख्यान आयोजित केल्याचे सांगितले व स्कूलमधून नेहमीच विद्यार्थ्यांच्या हिताचे उपक्रम राबवण्याचे आश्वासन दिले.

डॉ. पल्लवी तोडमल यांनी उपस्थित महिला पालक व विद्यार्थिनींना आरोग्य, आहारविषयक मार्गदर्शन केले. आजच्या काळात स्त्री सर्व क्षेत्रात पुढे आहे सर्व जबाबदाऱ्या स्वीकारते. परंतु हे करत असताना स्वतःच्या आरोग्यासाठी व्यायाम व योगासने यांचे महत्त्व त्यांनी सांगितले.

मोबाईल व टीव्ही स्क्रीन समोर जास्त वेळ दिल्याने होणारे दुष्परिणाम सांगून ते टाळण्यास सांगितले. विद्यार्थिनी व महिला पालकांच्या शंकांचे निरसन केले.

पाहुण्यांचा परिचय शुभांगी पाटोळे यांनी करून दिला. सूत्रसंचालन इ. आठवीच्या विद्यार्थिनी बुशरा शाहीद शेख व भक्ती किशोर भणगे यांनी केले. इ. ७ वी च्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. रेणुका दाभाडे यांनी आभार मानले

# अहिल्यानगरमध्ये १९ मार्च रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

## रुबी हॉल क्लिनिक येथील हृदयरोग तज्ज्ञांचे उपचार मार्गदर्शन

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १९ मार्च रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नगर शहरात तारकपूर येथील सिटी केअर हॉस्पिटल मध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणाम कारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात आवर्जून तपासणी करून घ्यावी. नगरमधील शिबिरासाठी ७३८५१९५९६२, ९२०९६३२५०२ या मोबाईल क्रमांकावर नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# मिशन होमिओपॅथी अहिल्यानगरतर्फे 'डाऊटस् टू मास्टरी ऑन क्लासिकल होमिओपॅथी' चर्चासत्र उत्साहात

## तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन; १२० डॉक्टर व विद्यार्थ्यांची उपस्थिती

नगर – होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल ह्यनिमन यांच्या जन्मदिनानिमित्त १० एप्रिल हा दिवस जागतिक होमिओपॅथी दिवस म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर तसेच होमिओपॅथिक हॉस्पिटलचे जनक म्हणून प्रसिद्ध असलेले पिंपरी (पुणे) येथील होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम यांच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या मिशन होमिओपॅथी, अहिल्यानगर या संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही 'डाऊटस् टू मास्टरी ऑन क्लासिकल होमिओपॅथी' या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. हे चर्चासत्र उत्साहात पार पडले.



मिशन होमिओपॅथी अहिल्यानगरतर्फे 'डाऊटस्  टू मास्टरी ऑन क्लासिकल होमिओपॅथी' चर्चासत्राचे उद्घाटन माऊली सेवा प्रतिष्ठान, मनगाव (अहिल्यानगर) चे संचालक डॉ. राजेंद्र धामणे व उदय भणगे यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. राजेंद्र धामणे म्हणाले की, डॉ. अमरसिंह निकम यांनी सुरू केलेले मिशन होमिओपॅथी हे कार्य खरोखरच उल्लेखनीय आहे. ही चळवळ अधिक व्यापक व्हावी यासाठी डॉ. निकम यांचे शिष्य अहिल्यानगर येथे टीम मिशन होमिओपॅथीच्या माध्यमातून जोमाने कार्य करत आहेत, त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. आजच्या काळात क्लासिकल होमिओपॅथीचा प्रसार होण्यासाठी आणि समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांपर्यंत त्याचा प्रचार व्हावा यासाठी अशा प्रकारची चर्चासत्रे व कार्यशाळा वेळोवेळी घेणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी मिशन होमिओपॅथी टीमने मनगाव प्रकल्पातील मनोरुग्ण व लहान बालकांवर होमिओपॅथी उपचार सुरू करावेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

यावेळी उदय भणगे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, टीम मिशन होमिओपॅथी, अहिल्यानगर यांचे कार्य अत्यंत स्तुत्य आहे. मी देखील या टीमचा एक भाग म्हणून गेल्या चार वर्षांपासून कार्य करीत असून त्याचा मला विशेष आनंद होत आहे.

या विशेष क्लासिकल होमिओपॅथी सेमिनारसाठी सोलापूर येथील होमिओपॅथी तज्ञ डॉ. मयूर काकडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तसेच इतर वक्त्यांमध्ये कोपरगाव येथील होमिओपॅथिक तज्ञ डॉ. शितलकुमार सोनवणे व अहिल्यानगर येथील होमिओपॅथिक तज्ञ डॉ. साईनाथ चिंता यांचीही व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

या सेमिनारसाठी अहिल्यानगर येथील काकासाहेब म्हस्के होमि ओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय तसेच अहमदनगर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय येथील विद्यार्थी उपस्थित होते. विशेष म्हणजे या चर्चासत्रासाठी कोपरगाव येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज तसेच नेवासा फाटा येथील अटल बिहारी वाजपेयी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज येथील विद्यार्थी व शिक्षकांनीही सहभाग नोंदविला.

या चर्चासत्रात तज्ज्ञ होमिओपॅथिक डॉक्टरांनी लिव्हर सिरोसिस, मिनिअर्स डिसीज, स्पायनल कॉर्ड डिसीज (कॉर्ड कॉम्प्रेशन), निमोनिया, मलेरिया, सोरीयासिस यांसारख्या असाध्य आजारांवर होमि ओपॅथी उपचारांचे होणारे फायदे उदाहरणांसह स्पष्ट केले. तसेच अशा उपचारासाठी अभ्यासपूर्वक आणि निरीक्षणपूर्वक रुग्णाचे परीक्षण करणे किती महत्त्वाचे आहे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या चर्चासत्राचा लाभ घेण्यासाठी सुमारे १२० डॉक्टर व विद्यार्थी उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे कै. अशोकराव जंगले पाटील व पोपटराव जंगले पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्मृती गौरव पुरस्कार मिशन होमिओपॅथीतर्फे प्रदान करण्यात येतो. यावर्षीचा स्मृती गौरव पुरस्कार २०२६ हा अंतिम वर्षात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थिनी डॉ. वैष्णवी मावळे व डॉ. तनिशा परदेशी तसेच उदयोन्मुख होमिओपॅथिक डॉक्टर डॉ. पूजा काशिद यांना प्रदान करण्यात आला.

चर्चासत्राच्या यशस्वी आयोजनासाठी टीम मिशन होमिओपॅथीचे डॉ. अनिल नवथर, डॉ. संकेत लांडे, डॉ. सचिन ठाणगे, डॉ. सुनिता चिंता, डॉ. रूपाली जंगले, डॉ. आकांक्षा लांडे व डॉ. बाळकृष्ण जवरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. निलेश जंगले यांनी केले.

# गृहिणी

## आरोग्य

### जिमला जात असाल तर...

आजच्या काळात अनेक लोक फिटनेसच्या प्रति जागरूक झाले आहेत. तसेच इंटरनेटवर फिटनेस जास्त ट्रेंड वर आहे. आजकाल लोक आपल्या फिटनेसला घेऊन अनेक उपाय करत आहे. अशात जिमचा ट्रेंड पण वाढला आहे. जिम मध्ये जाणे आरोग्य आणि सुंदरता या दोघांसाठी चांगले आहे. जिमच्या मदतीने तुम्ही तुमच्या शरीराला व्यवस्थित घडवू शकतात. आणि चांगला बॉडी शेप मिळवू शकतात. व्यायाम करतांना बऱ्याच गोष्टींकडे लक्ष ठेवावे लागते ज्यात डाइट आणि योग्य पद्धतीने व्यायाम करणे आवश्यक असते. याशिवाय पण काही इतर कार्य किंवा गोष्टी असतात. व्यायाम करतांना चेहऱ्याला हात लावणे किंवा त्वचेवर हात घासणे तुमच्या त्वचेसाठी चांगले नसते. ज्या हतांनी तुम्ही त्या मशीनांना स्पर्श करतात त्यावर जास्त प्रमाणात बॅक्टीरिया असतो. जे तुमच्या त्वचेवर मुरुम, पूरळ, खाज इतर समस्या निर्माण करू शकतात.

## पाककला

### क्रिमी दही ओनीयन चटणी

**साहित्य :** दही १ वाटी, कांदा १ मध्यम आकाराचा, हिरवी मिरची १ ते २, कोथिंबीर, साखर अर्धा छोटा चमचा, मीठ चवीनुसार, जिरे पूड अर्धा छोटा चमचा

**कृती :** दही फेटून घ्या एका बाऊलमध्ये १ वाटी दही घ्या. ते चमच्याने किंवा विस्करने छान फेटून घ्या, जोपर्यंत ते एकदम स्मूथ आणि क्रिमी होत नाही. कांदा आणि मिरची टाका फेटलेल्या दह्यामध्ये बारीक चिरलेला कांदा आणि हिरवी मिरची घालून मिक्स करा. मसाले घाला आता त्यात चवीनुसार मीठ, साखर आणि भाजलेली जिरे पूड टाका. कोथिंबीर भरपूर बारीक चिरलेली कोथिंबीर घालून पुन्हा एकदा हलक्या हाताने ढवळून घ्या. थंड करा ही चटणी १०-१५ मिनिटे फ्रिजमध्ये ठेवून थंडगार सर्व्ह केल्यास त्याची चव अधिकच छान लागते.

## वास्तू

✻ बाल्कनीच्या भिंतींना हलकासा निळा किंवा पिवळा रंग द्यावा जर पांढरा रंग दिला असेल तर चांगलेच आहे.

✻ बाल्कनीमध्ये बसण्यासाठी पश्चिम दिशेला छोटेसे लकडाचे फर्नीचर असावे. हे फर्नीचर जास्त मोठे नको.

✻ तुम्हाला हवे असल्यास उत्तर-दक्षिण दिशेकडे झोका लावू शकतात.

✻ जर तुमची बाल्कनी मोठी असेल तर तिथे छोट्याश्या कारंजा देखील लावू शकतात. बाल्कनीमध्ये हलका पांढरा प्रकाशाचा उपयोग करावा. बाल्कनीमधून हवा आणि प्रकाश येतो तर तिथुन रोग देखील येऊ शकतात.

## सौंदर्य

ग्लिसरीन त्वचेतील ओलावा अडकवण्याचे काम करते. हिवाळ्यात पाय मऊ, गुळगुळीत आणि भेगा न पडण्यासाठी ग्लिसरीन हा एक सोपा उपाय आहे.

## सल्ला

जर तुम्हाला साधी चटणी आवडत नसेल, तर एका छोट्या पळीत थोडे तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे आणि कढीपत्त्याची फोडणी देऊन ती चटणीवर टाका. यामुळे चटणीला छान खमंग चव येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १८ मार्च २०२६

**दर्श अमावास्या, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, पू.भा.२९।२१, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०५ वा. २४ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** परस्पर विश्वास हवा, गुंते सुटतील, चर्चा व ओळखीने कामे होतील. अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया नका घालवू.

**वृषभ :** शैक्षणिक संधी मिळेल, विकासात्मक कामांना वेग येईल, संतुलन हवे. सामाजिक स्नेह मेळावे आणि रम्य सहली तुम्हाला आनंदी आणि रिलॅक्स करतील.

**मिथुन :** धावपळ टाळा, लोक वेळ वा शब्द पाळतील, परिचितात लाभ होईल. शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या तुम्हाला खचल्यासारखे वाटेल. थोडा आराम करा.

**कर्क :** वस्तू सांभाळा, कामे रेंगाळतील, दिवस आळसात जाईल. आयुष्याबद्दल उदार दृष्टीकोन तयार करा. वाहने सावकाश चालवावीत.

**सिंह :** परिचितांवर खर्च शक्य, प्रवास टाळा, हट्ट व आग्रह नको. तणावमुक्तीसाठी तुमच्या मुलांसोबत मौल्यवान वेळ घालवा. दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होतील.

**कन्या :** वेळ घालवू नका, नव्या क्षेत्रात शिरकाव होईल, वेगळेपणा भाव खाऊन जाईल. अत्यंत व्यस्त दिवस असला तरी आरोग्य चांगले राहील.

**तूळ :** कलेत रुची राहील. स्त्री वर्गाला लाभ, माता-पित्यांना ताण. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.

**वृश्चिक :** दुपारनंतर उत्तम विकास, कामात विलंब होणार, चर्चेचे गुऱ्हाळ राहील. आनंदाने खुशीने परिपूर्ण असा चांगला दिवस. नियोजनबद्धरित्या कामे केल्याने वेळ सत्कार्णी लागेल.

**धनु :** हेवे-दावे टाळा, स्वतः धावपळ करावी लागेल, नशिबावर अवलंबून नको. तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल.

**मकर :** आग्रही मत आणि अभ्यासू वृत्ती यश देणार आहे. वाद हे ठामपणे जिंकाल. अतिखाणे टाळा, तंदुरुस्त राहण्यासाठी हेल्थ क्लबला नियमित जा.

**कुंभ :** नवी वाट निवडाल. कर्जे देणे-घेणे टाळा. खरेदीत मन रमेल. गरोदर स्त्रियांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

**मीन :** देणगीचे वा अनुदान याबाबतचे काम होईल. फसगती माणसे टाळा. मागील उधारी व उसनवारी वसुल होईल.

## शब्दगंध क्र. ७३८९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ■ | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | ८ | | | | ९ | | |
| १० | | | ■ | ११ | | ■ | |
| | ■ | ■ | १२ | | ■ | १३ | |
| १४ | १५ | ■ | १६ | | १७ | | ■ |
| ८ | | ■ | ■ | १९ | | ■ | २० |
| २१ | | | ■ | २२ | | | |
| ■ | | ■ | २३ | | | ■ | |

**आडवे शब्द :-** २) तळलेला एक खमंग पदार्थ जो दिवाळीत हमखास असतो ५) तपास; शोध; ठावठिकाणा; पत्ता ७) अतिशय श्रीमंत माणूस १०) साठ हजार पुत्र असलेला पुराणातील एक राजा ११) दातांत धरून वाजविण्याचे एक पोलादी वाद्य; पण; प्रतिज्ञा १२) मोठा भाऊ; गुंड १३) पीकवाढीसाठीचा एक आवश्यक घटक १४) इटलीची राजधानी; लव; अंगावरील बारीक केस १६) गोलाकार फिरणारा वारा १८) अरण्य; जंगल; रान १९) एक प्रकारची दारू २१) जिव्हा; जीभ; एक पेय २२) किरकिर; डोकेदुखी २३) अत्युच्च; सर्वोच्च

**उभे शब्द :-** १) हिंदूंचे तीर्थक्षेत्र असलेला हिमालयातील एक जलाशय २) एक पक्षी ३) कपट; कावा; कारस्थान ४) जुन्या काळातील एक हिंदी चित्रपट अभिनेत्री (बिदाई, मनचली) ५) आई; जननी; माता ६) नातेवाईक; नातलग ८) ओळख; वशिला ९) क्रोध १२) वैर; हक्क; फिर्याद; दुष्मनी १३) चिकट पेज; दुष्ट माणूस १५) स्वारांवरची हुद्द्याची एक जागा (पूर्वीच्या काळातील) १७) एक प्रकारची घोडागाडी २०) कुंपणाचा मोठा दरवाजा; गेट

### शब्दगंध क्र. ७३८८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | त | त | धा | र | ■ | ख | डा |
| क | र | ण | ■ | म | र्क | ट | ■ |
| ल | त | ■ | म | ■ | ■ | प | र्ण |
| न | री | म | न | पॉ | इं | ट | ■ |
| ■ | त | ■ | स | ल | ग | ■ | पा |
| सा | ■ | बा | ब | ■ | ळी | ■ | रं |
| ह | वा | ल | दा | र | ■ | मा | ग |
| स | डा | ■ | र | स | र | शी | त |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : नासका आंबा पेटीतल्या चांगल्या आंब्यांना सडवतो त्यामुळे नकारात्मक लोकांपासून लांब राहा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणत्या देशांमध्ये सिंह आणि बिबट्या पाळीव प्राणी म्हणून पाळले जातात?

काही देशांमध्ये सिंह, चित्ता आणि बिबट्या यांसारख्या वन्य प्राण्यांना पाळीव प्राणी म्हणून पाळण्याची परवानगी आहे, तर अनेक देशांमध्ये त्यावर पूर्णपणे बंदी आहे. अमेरिकेतील अनेक राज्यांमध्ये लोक या प्राण्यांना पाळीव प्राणी म्हणून पाळतात. जगात असे अनेक देश आहे जिथे लोक वन्य प्राण्यांना पाळीव प्राणी म्हणून पाळतात. हे विचित्र वाटेल, परंतु अमेरिका आणि युएईमध्ये सिंह, चित्ता आणि बिबट्या सामान्य आहे. तथापि, भारतामध्ये यावर पूर्णपणे बंदी आहे. नियमांमध्ये इतका फरक का आहे ते समजून घेऊया.

अमेरिकेतील अनेक राज्यांमध्ये कायदे खूपच शिथिल आहे. येथे लोक सिंह, चित्ता, कोल्हे आणि इतर अनेक वन्य प्रजाती त्यांच्या घरात पाळतात. अंदाजानुसार, सुमारे १२ राज्यांमध्ये लोकांच्या घरात ५,००० हून अधिक चित्ते पाळले जातात, तर जंगलात त्यांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. अमेरिकेत, राज्यानुसार कायदे वेगवेगळे असतात आणि अनेक ठिकाणी, या प्राण्यांना पाळण्यावर कोणतेही कठोर निर्बंध नाहीत.

तसेच युएईमध्ये, श्रीमंत व्यक्तींमध्ये सिंह आणि बिबट्या पाळणे हे स्टेटस सिम्बॉल मानले जात असे. २०१६ मध्ये, दुबईच्या समुद्रकिनाऱ्यावरील रस्त्यावर गाड्यांच्या ताफ्यासह फिरणाऱ्या पाच पाळीव चित्त्यांचे फोटो व्हायरल झाले. तथापि, २०१७ नंतर, युएईने कठोर वन्यजीव कायदे लागू केले. आता, सिंह आणि बिबट्या घरी ठेवल्यास मोठा दंड आणि तुरुंगवास होऊ शकतो. त्यांना फक्त प्राणीसंग्रहालय, संशोधन केंद्रे किंवा सर्कसमध्ये परवानगी आहे.

भारतात, सिंह, वाघ किंवा बिबट्या असो, कोणताही वन्य प्राणी खाजगीरित्या ठेवणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार, या प्रजाती पाळल्यास कठोर शिक्षा आणि मोठा दंड होऊ शकतो.

नियम खूप कडक आहे प्राण्यांच्या सुरक्षिततेला आणि संरक्षणाला प्राधान्य देतात. वन्य प्राण्यांना घरी ठेवणे केवळ धोकादायकच नाही तर त्यांच्या नैसर्गिक वर्तनासाठी आणि सुरक्षिततेसाठी देखील हानिकारक आहे. अमेरिका आणि युएई सारख्या देशांमध्ये, नियमांच्या ढिसाळतेमुळे, अशा प्राण्यांना अनेकदा पाळीव प्राणी म्हणून ठेवले जाते, तर भारत आणि पाकिस्तानमध्ये, जोखीम आणि संवर्धनाच्या चिंतेमुळे ही पद्धत कठोरपणे प्रतिबंधित आहे.

### शहानिशा


एकदा एका सापाने एका सरोवरात राहणाऱ्या सर्व बेडकांना खाण्याची योजना आखली. साप बेडकांना म्हणाला, एका ऋषीच्या शापामुळे मी तुमची सेवा करण्यासाठी येथे आलो आहे.

बेडूक राजा खूप उत्साहित झाला आणि त्याने सर्व बेडकांना हे सांगितले. सर्व बेडूक सापाच्या पाठीवर उडी मारून निघाले.

दुसऱ्या दिवशी, साप म्हणाला, माझ्याकडे खाण्यासाठी काहीही नाही. मी पुरेसा वेगाने रेंगाळू शकत नाही. बेडूक राजा म्हणाला, तुम्ही तुमच्या शेपटीच्या मागे बसलेल्या सर्वात लहान बेडकाला खाऊ शकता. सापाने तसे केले. काही दिवसांत, सापाने सर्व बेडकांना एक एक करून खाल्ले. फक्त बेडूक राजा राहिला.

दुसऱ्या दिवशी, बेडूक राजा पुन्हा म्हणाला, तुम्ही तुमच्या शेपटीच्या मागे बसलेल्याला खाऊ शकता. सापाने लगेच त्याला खाल्ले.

तात्पर्य : कधीही शहानिशा केल्याशिवाय कोणावरही विश्वास ठेऊ नये.



## जीवन का अमृत (भाग १)

शब्द-धुन सतुगुरु का ही इजहार है और यह आप पर और उन सभी पर उसकी लगातार दया और ध्यान को दर्शाती है, जो प्रेम से उसकी दया को पाना चाहते हैं । गुरु-सत्ता आपकी सदा की साथी है और नामलेवाओं के हृदयों में उठ रही प्रबल इच्छाओं से अनभिज्ञ नहीं है।

७७. मुझे खुशी है कि आप असली सतुगुरु के बारे में दूसरे लोंगों के भ्रम और भ्रांतियों को दूर करने में सफल हुए। अंतर में प्रभु की ज्योति और प्रभु की वाणी का प्रत्यक्ष अनुभव मिलना एक अनूठा सौभाग्य है और यह सर्वोत्तम तरीका है, सच्चे सतुगुरु और झूठे गुरुओं के बीच फर्क करने का। हर नामलेवा को चाहिए कि वह नियमित रुप से श्रद्धा और प्रेम के साथ, भजन-सिमरन में समय दें और इस प्रकार अपना अनुभव दिन-प्रतिदिन बढ़ाए। ऐसा करने से सच्चे रास्ते में, जिस पर उसे चला दिया गया है, उसका विश्वास और पक्का हो जाएगा, जब तक कि

### सद्गुरू का सामर्थ्य

वह सतुगुरु के नूरी स्वरूप की जिंदा वास्तविकता को स्वयं नहीं देखने लगता ।

जो उसकी ओर मुँह करेंगे, वे उसके सामर्थ्य का पर्याप्त प्रमाण पाएँगे। सतुगुरु का अपने बच्चों के प्रति प्रेम अनोखा और असीम है। जहाँ तक आपके ध्यान-अभ्यास में सतुगुरु का चेहरा आने का सवाल है, जो कि पवित नामों के जाप से गायब हो जाता है, उसके लिए कहा जा सकता है कि यह नकारात्मक शक्ति (काल) का काम है। आपको चिंता नहीं करनी चाहिए। आपको बाद में जो मुसीबत पेश आई, वह इस वजह से नहीं थी, बल्कि पुराने कर्मों का नतीजा थी, जिन्हें अवश्य ही भुगतना होता है, हालाँकि उनकी तीव्रता और अवधि सतुगुरु की दया से काफी कम हो जाती है । गुरु-शक्ति की दया और उसका संरक्षण सदा आपके सिर पर है और आपको घबराने की कोई जरूरत नहीं ।

७८. गुरु-सत्ता के दयालु संरक्षण की से बहुत ऐसी शानदार खबरें दूसरे केन्द्रों से भी मिली हैं, जहाँ पर श्रद्धालु लोगों ने सतुगुरु की शारीरिक मौजूदगी को सिर्फ महसूस ही नहीं किया, बल्कि अक्सर सतुगुरु को प्रफुल्लित होकर अपने बीच में चलते हुए देखा। ये सब अपने बच्चों के लिए उसकी दिव्य दया और संरक्षण को दर्शाते हैं, ताकि बच्चे सतुगुरु की सतत् दया के बारे में आश्वस्त रहें।

७९. सतुगुरु का अपने बच्चों के प्रति प्रेम अथाह होता । बच्चे अक्सर गन्दगी से भरे होते हैं। वह न तो उनको छोड़ेगा, न ही उन्हें निराश करेगा, बल्कि पहले उनकी गंदगी साफ करेगा और फिर प्रेमपूर्वक अपनी छाती से लगाएगा। अतः आप किसी तरह का डर, या गलतफहमी मन में ना लाएँ। बल्कि अपनी ओर से पूरी श्रद्धा, प्रेम, गंभीरता और दृढ़ता से लगातार कार्य करते रहें । आपको हर जरूरी सहायता और सुरक्षा मिलेगी, सिर्फ उसकी ओर देखने की जरूरत है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

वर्ष आपल्या परिस्थितीसाठी किवा आपल्या वागण्यासाठी आपण सतत इतरांना जबाबदार ठरवत आलो. जितक्या जास्त प्रमाणात आपण असं वागतो तितकी आपली शक्ती कमी होते आणि समोरच्यांची ताकद वाढते. प्रत्येक वेळेस आपण परिस्थितीला आणि इतरांना आपल्या मनोवस्थेवर राज्य करण्याची परवानगी देतो. सुरेश ओबेरॉय : पण जेव्हा मी एखाद्याच्या वागण्यावर प्रतिक्रिया देतो तेव्हा मला हे समजत नाही की त्या वेळी समोरचा माणूस मला नियंत्रित करतोय. त्या वेळी मला फक्त हे वाटतं असतं की मीच बरोबर आहे.

शिवानीदीदी : एक उदाहरण घेऊ या. तुम्ही एका खुचीत आरामात बसलाय. कोणीतरी आलं आणि त्यानं ती खुर्ची जोरात हलवली. ती व्यक्ती तुमच्यापेक्षा जास्त शक्तिशाली असेल तर ती तुम्हाला हलवून त्या खुर्चीवरून पाडेल. पण जर का तुम्ही शक्तिशाली असाल तर त्या व्यक्तीने कितीही प्रयत्न केले तरीही तुम्ही तुमच्या जागी स्थिर राहाल. आता

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

प्रश्न असा आहे की, दोघांमध्ये जास्त ताकदवान कोण आहे? जसे तुम्ही शारीरिकदृष्ट्या शक्तिशाली असता तसेच भावनिकदृष्ट्याही कणखर असू शकता.

सुरेश ओबेरॉय : माझा नोकर आदल्या दिवशी दूध आणायचं विसरला म्हणून त्याने मला सकाळी कोरा चहा दिला त्यामुळे मी चिडलो. अशा सगळ्या परिस्थितींमध्ये मी कमकुवत होतो असा याचा अर्थ आहे का? शिवानीदीदी : जेव्हा जेव्हा आपण असं म्हणतो की, त्याच्यामुळे मी असं केलं, तेव्हा तेव्हा आपण जास्त कमकुवत होतो.

सुरेश ओबेरॉय : याचा अर्थ संपूर्ण जग मला नियंत्रित करत आहे?

शिवानीदीदी : याचा अर्थ आपलं आपल्यावर नियंत्रण नाही असा होतो. आपण सकाळी झोपेतून उठतो तेव्हा शांत असतो. उरलेला संपूर्ण दिवसही असाच शांततेत जावा असं आपल्याला वाटतं. आणि मग एखादी अप्रिय घटना घडते - जसं तुम्हाला सकाळी कोरा चहा मिळाला. त्यामुळे आपली चिडचिड होते आणि आपला आवाज चढतो. अशा प्रकारे आपण आपल्या सहज शांत अवस्थेपासून दूर जातो.

सुरेश ओबेरॉय : पण म्हणजे याचा अर्थ मी कधीच माझ्या सहज अवस्थेत राहत नाही? शिवानीदीदी : सकाळी, ती घटना घडायच्या आधी तुम्ही तुमच्या नैसर्गिक शांत अवस्थेतच होता.

सुरेश ओबेरॉय : पण कदाचित मी रात्री जेवताना एखाद्याशी मांडून झोपलो असेन किंवा संपूर्ण दिवस कोणावरतरी नाराज असेन. मग मी सहज, नैसर्गिक कधी होतो?

शिवानीदीदी : आपण सहज भावाने जगत नाही म्हणूनच तर आपण शांती, आनंद आणि प्रेम बाहेर शोधतो राहतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या : डॉक्टरसाहेब, तुम्हाला टाके घालता येतात का?

डॉक्टर : हो येतात की. कशाला घालायचे आहेत?

गण्या : ही घ्या चप्पल. हिचा बंद तुटलाय, जरा टाके घालून द्या.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ कोणत्या देशाने OPEC चा सदस्य बनण्यासाठी मंजुरी दिली आहे?

– ब्राझील

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

आहारामध्ये उपवासासाठी खजुराचा उपयोग अतिशय महत्त्वपूर्ण आहे. उपवासाचा पदार्थ स्वयंपाकघरात खजुराचा उपयोग केला जातो. चरकाचार्यांनी खजूर श्रमहारक व पौष्टिक म्हणून सांगितला आहे. मराठीमध्ये 'खजूर' किंवा 'खारीक', संस्कृतमध्ये 'खर्जुर', इंग्रजीमध्ये 'डेट', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'फिनिक्स डॉक्टिलिफेरा' (Phoenix Doctylifera) म्हटले जाते. खजूर हा पामी कुळातील आहे.

भारतात समुद्रकिनारी रेताड जमिनीमध्ये खजुराची झाडे उगवतात. सहसा आपण जो खजूर खातो तो सौदी अरेबिया, इजिप्त, इराक, अफगाणिस्तान या देशांमधून आलेला असतो. व्यवस्थित पिकलेल्या रसदार फळांना खजूर असे म्हणतात आणि अर्धवट पिकलेल्या सुक्या फळांना खारीक असे म्हणतात.

### खजूर

सर्वसाधारणपणे जायदी खजूर आणि पिंड खजूर असे दोन प्रकारचे खजूर बाजारात उपलब्ध असतात. जायदी खजूर हा उत्तम प्रतीचा खजूर असून, तो पिवळा सोनेरी आणि मांसल असतो, तर पिंड खजूर लाल किंवा काळसर-लाल, अधिक रसदार, चविष्ट आणि गुणांनी अधिक श्रेष्ठ असतो.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : खजूर मधुर, पौष्टिक, बलवर्धक, श्रमहारक, तृप्तीदायक, पचनास जड आणि वीर्यवर्धक आहे.

आधुनिक शाखानुसार खजुरामध्ये शरीरास पोषक अशी अनेक नैसर्गिक अन्नद्रव्ये आहेत. कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस व 'अ', 'ब' व 'क' जीवनसत्त्वे, प्रथिने, खनिजे, तंतुमय पदार्थ आपिष्टमय पदार्थ हे सर्वच घटक खजुरामध्ये असतात. म्हणून खजुराला पूर्ण आहार असेही संबोधिले जाते व त्यामुळेच फार पूर्वीपासून सहारा वाळवंटात त्याला रोटीइतकेच महत्त्वाचे मानले जाते. खजुरामध्ये ग्लुकोज व फुक्टोज स्वरूपातील नैसर्गिक साखर असते. ही साखर नैसर्गिक असल्यामुळे शरीराला बाधक नाही. म्हणूनच बाजारातील साखरेऐवजी खजुराचा वापर करावा. खजुरातील साखर रक्तात लगेच शोषली जाऊन शरीराला ऊर्जा मिळते. खजूर नुसता किंवा लोण्याबरोबर खावा. खजुराची नीरा ही फार पौष्टिक असून, ती ताजी पिणेच योग्य आहे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# जोश

**राजा कुमार यांच्या मते हा व्यवसाय फक्त २०,००० रुपयांत सुरू करता येतो. या व्यवसायातून आपल्या भागात राहून स्वतःचा मालक होता येते. रोजगाराच्या मर्यादित संधी असलेल्या बिहारसारख्या राज्यात स्थानिकांना रोजगार देण्याची ही चांगली संधी आहे. ते सांगतात, सध्या त्यांची चांगली कमाई होत आहे आणि पुढील दोन वर्षांमध्ये त्यांचे ५०० लोकांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट आहे.**

## छोटी नोकरी ते मोठा व्यवसाय



अचिव्हर

राजा कुमार पासवान फारसे शिक्षित नाहीत. शहरात नोकरीच्या पहिल्याच दिवशी त्यांना लोकांसमोर अस्वस्थ वाटले. काही लोकांनी त्यांची चेष्टाही केली आणि हे इथे कसे काम करणार, असे म्हटले. काही काळ नोकरी करून त्यांनी पैसे साठवले आणि आपल्या गावात परतले. गावात स्वतःचा व्यवसाय सुरू करून मालक बनण्याचा त्यांनी निर्णय घेतला. लहानपणी आई-वडिलांकडून ते ज्यूटपासून वस्तू बनवणे शिकले होते. तसेच शेजाऱ्यांकडूनही काही नवीन वस्तू बनवण्याचे कौशल्य आत्मसात केले. तयार केलेला माल ते विविध ठिकाणी होणाऱ्या जत्रांमध्ये विकू लागले. ज्यूट वस्तूंना चांगली मागणी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी ज्यूट क्राफ्टच्या नव्या तंत्रज्ञानासह स्टार्टअप सुरू केले. ते महिलांसाठी आणि पुरुषांसाठी विविध प्रकारची उत्पादने तयार करू लागले. देशभरात जिथे जिथे प्रदर्शन भरते, तिथे ते आपला माल घेऊन जातात. एका प्रदर्शनात ते दिवसाला सुमारे दोन लाख रुपयांपर्यंत विक्री करतात.

या ज्यूट व्यवसायातून ते ८ ते १० लोकांना रोजगार देत आहेत. त्यांनी दोन मोठ्या मशीन्सही बसवल्या आहेत. येथे दिवस-रात्र विविध उत्पादने तयार करून साठवली जातात. त्यानंतर बंगाल, बिहार, राजस्थानमधील विविध ठिकाणी तसेच बेंगळुरू, मुंबई, पुणे अशा अनेक शहरांमध्ये प्रदर्शनांद्वारे विक्री केली जाते. दोन वर्षांच्या मेहनतीत त्यांनी ज्यूट कला इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या नावाने चांगली ओळख निर्माण केली आहे. सरकारी कार्यक्रमांमध्येही त्यांना स्टॉल लावण्याची संधी मिळते आणि बिहार सरकारकडून प्रोत्साहनही दिले जाते.

राजा कुमार यांच्या मते फक्त २०,००० रुपयांत हा व्यवसाय सुरू करता येतो. या व्यवसायातून आपल्या भागात राहून स्वतःचा मालक होता येते आणि दुसऱ्या शहरात जाण्याची गरज राहत नाही. रोजगाराच्या मर्यादित संधी असलेल्या बिहारसारख्या राज्यात स्थानिकांना रोजगार देण्याची ही चांगली संधी आहे. ते सांगतात, सध्या त्यांची चांगली कमाई होत आहे आणि पुढील दोन वर्षांमध्ये त्यांचे ५०० लोकांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट आहे. या व्यवसायात खर्च कमी असून नफा जास्त आहे.

ज्यूट क्राफ्ट ही भारताची पारंपरिक हस्तकला असून मुख्यतः बिहार आणि बंगाल भागात ज्यूटची शेती होते. या कलेतून मऊ व टिकाऊ घरगुती वस्तू तयार केल्या जातात. त्यात ज्यूट बाटली बॅग, लंच बॅग, लेडीज हँडबॅग, शॉपिंग बॅग, लॅपटॉप बॅग, चप्पल, ज्यूट दागिने, गालिचे, चटया, मुलांसाठी झोके आदींचा समावेश आहे. ही उत्पादने पर्यावरणपूरक आहेत. त्यांचा वापर केल्याने पर्यावरणाचे संरक्षण होते आणि पारंपरिक कलेलाही चालना मिळते.

## डेटा सायन्समध्ये करिअरच्या संधी




करियर

डिजिटल युगात मोबाईल, सोशल मीडिया, ऑनलाइन बँकिंग आणि ई-कॉमर्समुळे प्रचंड प्रमाणात डेटा तयार होत आहे. या माहितीचे विश्लेषण करून त्यातून योग्य निर्णय घेणे ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे डेटा सायन्स इंजिनीअरिंग हे क्षेत्र वेगाने उदयास आले असून ते आशादायक करिअर पर्याय ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते 'डेटा हे नव्या युगातील इंधन' आहे, कारण उद्योग, संस्था आणि शासन व्यवस्था यांचा पाया आता माहिती आणि विश्लेषणावर आधारित आहे.

खासगी क्षेत्रात डेटा सायन्स तज्ज्ञांची मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. टीसीएस, इन्फोसिस, ॲक्सेन्चर, गुगल, ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्टसारख्या आयटी कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशिन लर्निंगमध्ये मोठी गुंतवणूक करत आहेत. बँका आणि वित्तीय संस्था फसवणूक शोधणे, जोखीम विश्लेषण आणि ग्राहकांचे वर्तन अभ्यासण्यासाठी डेटा ॲनालिटिक्सचा वापर करतात.

ई-कॉमर्स कंपन्या ग्राहकांना वैयक्तिकृत सेवा देण्यासाठी डेटा सायन्सचा उपयोग करतात. आरोग्य, उत्पादन आणि ऑटोमोबाईल उद्योगांमध्येही प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्सचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. आकर्षक वेतन आणि वेगवान करिअर प्रगतीमुळे हे क्षेत्र अधिक लोकप्रिय ठरत आहे.

डेटा सायन्स केवळ खासगी क्षेत्रापुरते मर्यादित नाही. डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी, आधार आणि नीती आयोग यांसारख्या राष्ट्रीय प्रकल्पांमध्ये डेटा विश्लेषकांची आवश्यकता भासते. इस्रो, डीआरडीओ आणि सीएसआयआरसारख्या संशोधन संस्थांमध्येही डेटा सायन्सचा वापर संशोधन आणि तांत्रिक विकासासाठी केला जातो. सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि सांख्यिकी विभागांमध्येही डेटा तज्ज्ञांची मागणी वाढत आहे.

डेटा सायन्स क्षेत्रात यश मिळवण्यासाठी तांत्रिक आणि विश्लेषणात्मक कौशल्ये अत्यावश्यक आहेत. पायथॉन, एसक्यूएलसारख्या प्रोग्रॅमिंग भाषांचे ज्ञान, सांख्यिकी आणि मशिन लर्निंगचे आकलन, तसेच पॉवर बीआय, टॅब्ल्यू आणि स्पार्क यांसारख्या साधनांचे ज्ञान आवश्यक आहे. यासोबतच समस्या सोडवण्याची क्षमता, तार्किक विचारसरणी आणि प्रभावी संवादकौशल्येही महत्त्वाची भूमिका बजावतात.

## फोनपेमध्ये एआयचा वापर




ॲप वर्ल्ड


फोन पे ॲपचा वापर अधिक उत्तम व्हावा यासाठी त्यांनी एआय-पॉवर्ड नॅचरल लँग्वेज सर्च फीचर सादर केले आहे. हे फिचर वापरकर्त्यांना भारतातील वेगाने वाढणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स इकोसिस्टिमच्या सहाय्याने टेक्स्ट किंवा व्हॉइस कमांड वापरून ॲपमधील कामे पूर्ण करण्यास अनुमती देते. मायक्रोसॉफ्ट फाउंड्री वापरून तयार केलेले हे फिचर युजर्सना पारंपारिक नेव्हिगेशनशिवाय त्यांच्या इच्छित कामांसाठी थेट मार्गदर्शन करून पेमेंट प्रक्रिया आणखी सुलभ करते.

एआय-पॉवर्ड नॅचरल लँग्वेज सर्च फीचर

हे फिचर 'पे हेमंत २० रुपीज' किंवा 'रिचार्ज फास्टॅग' सारख्या कमांडवर प्रक्रिया करू शकते. त्यामुळे पेमेंट इंटरफेस आपोआप उघडतो. कंपनीने हे फिचर नवी दिल्लीतील 'एआय इम्पॅक्ट समिट २०२६' मध्ये लॉंच केले. तिथे धोरणकर्ते, उद्योग पॉलिसी मेकर्स, इंडस्ट्री लीडर्स आणि रिसर्चर्स यांनी एआय धोरणाच्या भविष्यावर चर्चा केली. हे फिचर युजर्सचा हेतूदेखील समजू शकते. मग ते पेमेंट करणे असो, ऑनलाईन खरेदी पूर्ण करणे असो किंवा मदत मागणे असो. ऑन-डिव्हाइस आणि क्लाउड-आधारित प्रक्रियेच्या हायब्रिड मॉडेलचा वापर करून फोनपे सर्व वैयक्तिक आणि व्यवहार डेटा संग्रहित करते.

'फोन पे'चे राहुल चारी यांनी सांगितले, की हे फीचर लॉंचिंग व्यवहार टूल्स पेक्षा युजर्सच्या गरजा पूर्ण करणाऱ्या अधिक इंटेलिजन्स इंटरफेसकडे वळण्याचे प्रतिनिधित्व करते. एआय आम्हाला असा इंटरफेस तयार करण्यास मदत करते जो केवळ इनपुटच नाही तर हेतू देखील समजतो आणि गोपनीयता किंवा सुरक्षिततेशी तडजोड न करता व्हॅल्यू प्रदान करतो, असे ते म्हणाले.

मायक्रोसॉफ्ट इंडिया आणि साउथ आशियाचे अध्यक्ष पुनीत चंडोक यांनी फोनपेच्या एआय क्षमतांना पाठिंबा देण्यात मायक्रोसॉफ्ट फाउंड्रीची भूमिका अधोरेखित केली. त्यामुळे लाखो युजर्ससाठी एक सुरक्षित आणि स्केलेबल डिजिटल पेमेंट सोल्यूशन सक्षम झाले. हे स्मार्ट फिचर संपूर्ण भारतात बॅचच्या मदतीने आणले जात आहे आणि फोनपे पमधील ग्लोबल सर्च बार, मदत केंद्र आणि हिस्ट्री टॅबद्वारे ते ॲक्सेस करता येते.



## इथे करा इंजिनियरिंग

उच्चशिक्षण

इंजिनीअरिंगमध्ये करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थीची संख्या मोठी आहे. दरवर्षी लाखो विद्यार्थी जेईई परीक्षेची तयारी करतात. १२ वी पूर्ण झाल्यानंतर कोणते महाविद्यालय निवडायचे, हा त्यांच्या करिअरमधील सर्वात महत्वाचा टप्पा ठरतो. योग्य कॉलेजची निवड भविष्यातील यशाची दिशा ठरवू शकते. महाराष्ट्रातील ही पाच अभियांत्रिकी महाविद्यालये देशभरात प्रसिद्ध आहेत.

आयआयटीसह अनेक नामांकित संस्था उत्कृष्ट शिक्षणपद्धती, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि आकर्षक प्लेसमेंटसाठी ओळखल्या जातात. जेईई परीक्षेची तयारी करत असाल किंवा निकालानंतर सर्वोत्तम पर्याय शोधत असाल तर एनआयआरएफ रँकिंग २०२५ नुसार महाराष्ट्रातील टॉप ५ अभियांत्रिकी महाविद्यालयांविषयी अधिक माहिती आजच्या खास लेखात आम्ही तुम्हाला सांगत आहोत.

**केमिकल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, मुंबई**

आयसीटी मुंबई हे राज्यातील आघाडीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी एक आहे. एनआयआरएफ २०२५ नुसार त्यांची रँक ४१ आहे. येथे केमिकल इंजिनिअरिंग आणि फूड इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी सारख्या अभ्यासक्रमांमध्ये एमएच-सीईटी किंवा जेईई मुख्य परीक्षेतील गुणांच्या आधारे प्रवेश दिला जातो.

**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बॉम्बे**

आयआयटी बॉम्बे महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. एनआयआरएफ २०२५ च्या अभियांत्रिकी श्रेणीमध्ये याचा संपूर्ण भारतात तिसरा क्रमांक आहे. विविध बी.टेक अभ्यासक्रमांसाठी अंदाजे १,३६० जागा उपलब्ध आहेत. प्रवेश जेईई मेन आणि जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षांमधील गुणांवर तसेच जोएसएए असाइनमेंट प्रक्रियेवर आधारित आहे.

**सीईओपी तंत्रज्ञान विद्यापीठ**

सीईओपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे हे एक सरकारी अभियांत्रिकी विद्यापीठ आहे. एनआयआरएफ २०२५ नुसार त्यांची रँक ९० आहे. येथे, सिव्हिल, संगणक विज्ञान, इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल अभियांत्रिकी सारख्या विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश एमएचटी-सीईटी आणि जेईई मुख्य परीक्षेतील गुणांच्या आधारे केला जातो.

**विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था नागपूर**


एनआयआरएफ २०२५ नुसार व्हीएनआयटी नागपूर ४४ व्या क्रमांकावर आहे. इथे विविध बी.टेक अभ्यासक्रमांसाठी सुमारे ९३३ जागा उपलब्ध आहेत. प्रवेश प्रामुख्याने जेईई मुख्य परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे केला जातो.

संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्था

डीआयएटी पुणे ही संवर्धन तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील एक विशेष संस्था आहे. अर्जदाराला त्यांना २०२५ च्या अभियांत्रिकी श्रेणीमध्ये ९२ वा क्रमांक मिळाला आहे. यूजी, पीजी आणि पीएचडी स्तरावरील अभ्यासक्रम येथे उपलब्ध आहेत.

बी.टेकसाठी प्रवेश जेईई मेन स्कोअरवर आधारित आहे आणि एम.टेकसाठी प्रवेश गेट परीक्षेच्या स्कोअरवर आधारित आहे.

## बॅटरीचे आयुष्य वाढवायचेय?



आजकाल लॅपटॉप हा आपल्या दैनंदिन कामाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे; परंतु लॅपटॉप वेगाने डिस्चार्ज होत असेल, तर कामात अडथळा येऊ शकतो. सामान्यतः, नवी लॅपटॉप बॅटरी चार ते सहा तास टिकते; परंतु बॅकअपचे प्रमाण वेळेनुसार कमी होऊ लागते. तथापि, काही सोप्या टिप्स आणि 'सेटिंग्ज'चा अवलंब करून लॅपटॉपच्या बॅटरीचे आयुष्य वाढवता येते.

बॅटरीचा बॅकअप वाढवण्यासाठी स्क्रीन ब्राइटनेस कमी करा. कारण लॅपटॉप स्क्रीन सर्वात जास्त बॅटरी वापरतो. ब्राइटनेस जास्त असल्यास, बॅटरी वेगाने संपते. हे कमी करण्यासाठी विंडोजमध्ये ॲक्शन सेंटर (विंडोज + ए) उघडा आणि ब्राइटनेस ३०-४० टक्क्यांवर सेट करा. एफ १ की दाबून मॅकबुकमधील ब्राइटनेस कमी करा. बॅटरी सेव्हर मोड चालू करा. विंडोज आणि मॅकओसमध्ये बॅटरी सेव्हर मोड प्रदान केला आहे. तो ॲप्सची बॅकग्राउंडमधील हालचाल कमी करून बॅटरीचे आयुष्य वाढवतो. अनेक वेळा आपण अशी सॉफ्टवेअर आणि ॲप्स उघडी ठेवतो, ज्यांची गरज नसते आणि ते बरीच बॅटरी वापरत राहतात. अशा वेळी विंडोज टास्क मॅनेजर उघडा आणि अनावश्यक प्रक्रिया थांबवा. वापरकर्ते बॅकग्राउंडवर सुरु असलेली ॲप्स बंद करू शकतात. गरज नसताना वाय-फाय आणि ब्लूटूथ बंद करावे. हे बॅटरीचा वापर १०-२० टक्के वाढवू शकतात.

याशिवाय लॅपटॉप गरम होऊ लागल्यास, बॅटरी लवकर संपते. हे टाळण्यासाठी लॅपटॉप सपाट आणि थंड ठिकाणी ठेवावा. कूलिंग पॅड वापरावे. धूळ साचल्यास लॅपटॉपचा पंखा स्वच्छ करुन योग्यरित्या चार्ज करावा. बॅटरी शंभर टक्के चार्ज करू नये तसेच दीर्घकाळ प्लग इन करून ठेवावी. ती २० टक्क्यांपेक्षा कमी असेल तेव्हाच चार्जिंग सुरू करावे. जलद चार्जिंग टाळावे, कारण ते बॅटरीचे आयुष्य कमी करू शकते. लॅपटॉपमध्ये हे छोटे बदल केले तर बॅटरी जास्त काळ टिकेल आणि पुन्हा पुन्हा चार्जिंग करण्याची गरज लागणार नाही.

## स्मार्टफोनमध्ये व्हायरस?

टेक्नो टॉक




तुमच्या फोनमध्ये खालील ३ महत्त्वाचे बदल दिसून येत असतील तर सावध व्हा. कारण तुमच्या डिव्हाइसमध्ये धोकादायक व्हायरस किंवा मालवेअरची एन्ट्री झालेली असू शकते. वेळेत लक्ष न दिल्यास तुमचा पर्सनल डेटा आणि बँक खात्याची माहिती चोरीला जाऊ शकते.

१. बॅटरी झपाट्याने संपणे आणि फोन गरम होणे

तुमच्या फोनची बॅटरी पूर्ण चार्ज असूनही काही तासांमध्येच संपत असेल तर हे व्हायरसचे प्रमुख लक्षण आहे. व्हायरस बॅकग्राउंडमध्ये सतत सक्रिय राहून प्रोसेसिंग पॉवर वापरतात. त्यामुळे कोणताही हेवी वापर नसतानाही फोन प्रचंड गरम होतो. अशा वेळी सेटिंगमध्ये जाऊन बॅटरीचा वापर तपासा. एखादे अनोळखी ॲप जास्त बॅटरी वापरत असेल तर ते तत्काळ काढून टाका.


२. अचानक दिसणाऱ्या जाहिराती आणि पॉपअप्स

इंटरनेट बंद असताना किंवा होम स्क्रीनवर असतानाही तुम्हाला वारंवार विचित्र जाहिराती किंवा पॉपअप्स दिसत असतील तर तुमच्या फोनमध्ये ॲडवेअर शिरले आहे. हे व्हायरस केवळ जाहिराती दाखवत नाहीत, तर तुमच्या नकळत काही धोकादायक लिंक्सवर क्लिक करून घेतात. तसेच, तुमच्या फोनमध्ये तुम्ही इन्स्टॉल न केलेले अनोळखी ॲप्स दिसू लागले तर तो मोठा धोक्याचा इशारा समजावा.

३. डेटाचा वापर वाढणे आणि संशयास्पद व्यवहार

तुमचा इंटरनेट डेटा नेहमीपेक्षा जास्त वेगाने संपत असेल तर व्हायरस तुमच्या फोनमधील माहिती बाहेरील सर्व्हरवर पाठवत असण्याची शक्यता असते. याशिवाय, कॉन्टॅक्ट लिस्टमधील लोकांना तुमच्या नकळत मेसेज जाणे किंवा सोशल मीडिया अकाउंटवरून आपोआप पोस्ट होणे हे हॅकिंगचे संकेत आहेत. हे टाळण्यासाठी फोनमधील महत्त्वाच्या डेटाचा बॅकअप घेऊन फोन 'फॅक्टरी रिसेट' करणे हा सर्वात उत्तम उपाय ठरतो.

## पन्नास वर्षे बॅकअप देणारी बॅटरी!




तंत्रज्ञानातील सतत नवनवीन शोध लोकांची जीवनशैली सुलभ करत आहेत. आता एका चिनी स्टार्टअप कंपनी 'बीटाव्होल्ट' ने बॅटरीबाबत एक धक्कादायक दावा केला आहे. ते म्हणतात, की त्यांनी अशी बॅटरी विकसित केली आहे, जी ५० वर्षांपर्यंत पॉवर बॅकअप देईल. हे बॅटरी तंत्रज्ञान एखाद्या मोठ्या चमत्कारापेक्षा कमी नाही. म्हणजेच बॅटरी पुन्हा पुन्हा चार्ज करण्याची गरज भासणार नाही. हा शोध ऊर्जा साठवणुकीचा मार्ग पूर्णपणे बदलेल.

'बीटाव्होल्ट' म्हणते, की ते या वर्षापासून १वॉट बॅटरीचे उत्पादन सुरू करेल. 'बीटाव्होल्ट' म्हणते, की ते बॅटरी उद्योग पूर्णपणे बदलेल. कॉम्पॅक्ट आकार 'बीटाव्होल्ट'च्या अणुऊर्जा प्रणालीवर आधारित, या बॅटरीचा आकार खूपच कॉम्पॅक्ट आहे. त्याचा आकार १५१५१५ घन मिलिमीटर आहे, जो एका नाण्याएवढा आहे. जरी आकार लहान असला तरी तो ३ वॉटवर १००मेगावॉट ऊर्जा देऊ शकतो. या बॅटरीमध्ये ६३ न्यूक्लियर आइसोटोप कॉम्पॅक्टपणे स्थापित केले आहेत. यासोबतच निकेल-६३ लेयरसह १०-मायक्रॉन जाडीचा डायमंड सेमीकंडक्टरही बॅटरीमध्ये वापरण्यात आला आहे.

## आरोग्यदायी पीनट बटर सँडविच



झटपट रेसिपी

मित्रांनो, हॉस्टेलमध्ये आपल्याला काही तरी झटपट बनवायचं असतं. हाताशी फार वेळ नसतो तसंच भांडीही नसतात. दिवसभराच्या धावपळीमुळे थकवा आल्यानंतर शरीराला पोषक घटकही लागतात. अशा वेळी पीनट बटर बनाना सँडविच हा स्वस्तातला मस्त पर्याय आहे.

**साहित्य:** ब्रेड, पिनट बटर, केळ्याचे काप. (केळ्याऐवजी स्ट्रॉबेरी किंवा ब्लूबेरीही वापरता येतील.)

**कृती:** दोन किंवा चार ब्रेड स्लाईस घ्या. चारही स्लाईसच्या एका बाजूला पिनट बटर लावा. आता ब्रेडवर केळ्याचे काप ठेवा. वर दुसरा ब्रेड ठेऊन सँडविच बनवा. आवडत असतील तर ब्रेड टोस्ट करून घ्या. डाळिंब, सफरचंद अशी फळंही घालता येतील. नाश्ता किंवा रात्रीचं जेवण म्हणून तुम्ही हा पदार्थ खाऊ शकता. फळांमधून तुम्हाला भरपूर पोषक घटक मिळतील. तर पिनट बटरही खूप हेल्दी असतं. त्यामुळे अगदी झटपट हेल्दी पदार्थ तयार होतील.

# स्वच्छता व स्वयंशिस्तीतून कचरा मुक्त शहर घडविण्यासाठी योगदान द्या

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन, भिंगारच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योगभवनाचे लोकार्पण, उद्यानात ओपन जिम व स्वच्छतागृहासाठी निधी देण्याची घोषणा

नगर – समाजातील नागरिकांना एकत्र आणून सामाजिक, पर्यावरणीय आणि निरोगी जीवनशैलीची चळवळ उभारणारे हरदिन मॉर्निंग ग्रुपचे कार्य प्रेरणादायी आहे. भिंगार शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून कचरा मुक्तीसाठी प्रत्येकाने स्वयंशिस्त पाळणे अत्यंत गरजेचे आहे. सार्वजनिक स्वच्छता हीच आरोग्याची पहिली पायरी असून याबाबत समाजात जागरूकता निर्माण झाली पाहिजे. उद्याच्या सक्षम पिढीसाठी आजपासूनच स्वतः वर निर्बंध आणत स्वच्छतेला प्राधान्य देण्याची मानसिकता तयार करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

भिंगार छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योग व प्राणायामासाठी उभारण्यात आलेल्या योगभवनाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी उद्यानात ओपन जिम तसेच स्वच्छतागृह उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा त्यांनी केली. या कार्यक्रमाला भिंगार छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, माजी उपाध्यक्ष संभाजी भिंगारदिवे, माजी नगरसेवक ज्ञानदेव पांडुळे यांच्यासह ग्रुपचे सदस्य व उद्यानात येणारे नागरिक उपस्थित होते.

आमदार जगताप पुढे म्हणाले की, नव्याने उभारलेल्या योगभवनामुळे पावसाळा व उन्हाळ्यातही नागरिकांना व्यायाम, योग व प्राणायामाचा लाभ अखंडपणे घेता येणार आहे. सुदृढ आणि सक्षम पिढी घडविण्यासाठी आजपासूनच योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. भिंगारमध्ये विकासकामांना गती देत परिसराचा कायापालट करण्याचे काम सुरू आहे. भिंगारचा महापालिकेत समावेश करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, मात्र संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागा व शहराशी असलेले भौगोलिक अंतर यामुळे ते शक्य झाले नाही. त्यामुळे भविष्यात भिंगारमध्ये स्वतंत्र नगरपंचायत स्थापन करून विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


भिंगारच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये योगभवनाचे लोकार्पण करताना आ. संग्राम जगताप आदी.

अतिक्रमणाच्या मुद्यावरही त्यांनी ठाम भूमिका मांडली. शासनाच्या जमिनीवर होणाऱ्या अतिक्रमणासाठी संबंधित अधिकारी जबाबदार असल्याचे सांगत त्यांनी म्हटले की, योग्य वेळी कारवाई केली तर अतिक्रमण होण्याची शक्यता कमी होते. विभागांनी तक्रारीची वाट न पाहता स्वतःहून पुढाकार घेऊन कारवाई करावी. पुढील दहा ते पंधरा वर्षांचे नियोजन करून विकासकामे सुरू आहेत आणि प्रशासनाने ठाम भूमिका घेऊन काम केल्यास भिंगार शहर कचरा मुक्त व अतिक्रमणमुक्त करण्याचा संकल्प पूर्ण होईल.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते योगभवनाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. प्रास्ताविकात हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी सांगितले की, ग्रुपच्या रौप्य महोत्सवी वर्षात योगभवनाचे स्वप्न साकार होत असल्याचा विशेष आनंद आहे. योग आणि प्राणायामासाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध झाल्याने आरोग्याची चळवळ अधिक जोमाने पुढे जाईल. ग्रुपच्या माध्यमातून लोकसहभागातून उद्यानातील झाडांसाठी पाण्याचे टँकर उपलब्ध करून देणे, कोरोना काळात रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, वृक्षारोपण व संवर्धन तसेच निरोगी जीवनासाठी योग–व्यायामाचा प्रसार अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच स्वच्छता अभियानातही ग्रुप सक्रियपणे सहभागी होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सचिन चोपडा यांनी सांगितले की, योगासाठी उभारलेली ही वास्तू केवळ हॉल नसून आरोग्याचे केंद्र ठरणार आहे. सकाळच्या योग–प्राणायामामुळे मानसिक समाधान मिळते आणि आरोग्यदायी जीवनशैलीची जाणीव निर्माण होते. या ठिकाणातून आरोग्यविषयक चळवळीला नवे बळ मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वसंत राठोड यांनी सांगितले की, भिंगार छावणीसाठी यापूर्वी इतका मोठा निधी कधीच मिळाला नव्हता. आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नांमुळे मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाल्याने विकासकामांना गती मिळाली असून जनसामान्यांच्या समस्या मार्गी लागत आहेत. त्यांच्या विकासकामांमुळे भिंगारची प्रतिमा बदलत आहे. लवकरच भिंगार अतिक्रमणमुक्त करण्यासाठीही पुढाकार घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच शुक्रवार बाजार परिसरातील पाण्याच्या टाकीला गळती लागल्याचा प्रश्न मांडत त्यांनी सांगितले की, दुरुस्ती करण्यापेक्षा नवीन पाण्याची टाकी उभारल्यास भविष्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो. यासाठी आमदार संग्राम जगताप यांचे सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपेश पसपुल यांनी केले. सर्वेश सपकाळ यांनी आभार मानले.



गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अहिल्यानगर शहरातील एमआयडीसी परिसरातील सह्याद्री चौक, गजानन कॉलनी समोर 'श्री सालासार ह्युंदाई' या नवीन शोरूमचे ग्राहकांच्या सेवेसाठी उद्घाटन करण्यात आले आहे.

# 'श्री सालासार ह्युंदाई'मध्ये सवलती व बक्षिसांचा वर्षाव

### वाहन खरेदीसाठी नवी संधी

नगर – गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अहिल्यानगर शहरातील MIDC परिसरातील सह्याद्री चौक, गजानन कॉलनी समोर 'श्री सालासार ह्युंदाई' या नवीन शोरूमचे ग्राहकांच्या सेवेसाठी उद्घाटन करण्यात आले आहे. या शोरूममध्ये ह्युंदाई कंपनीची सर्व लोकप्रिय मॉडेल्स ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आली असून वाहन खरेदीवर आकर्षक सूट व बक्षिसे जिंकण्याची संधीही देण्यात येत आहे.

या शोरूममध्ये सेल्स, सर्व्हिस आणि एक्स्चेंज या सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे ग्रँड i10, क्रीटा आणि ओरा या मॉडेल्सवर ग्राहकांसाठी खास ऑफर जाहीर करण्यात आल्या आहेत.

ग्राहकांच्या गरजेनुसार विविध मॉडेल्स आणि व्हेरियंटस् येथे उपलब्ध असून वाहन खरेदीपूर्वी ग्राहकांना सोपी आणि जलद टेस्ट ड्राइव्हची सुविधा देण्यात येते. तसेच कागदपत्रांची प्रक्रिया जलद पूर्ण करून कोणत्याही अडचणीशिवाय वाहनाची डिलिव्हरी दिली जाते.

आघाडीच्या बँकांच्या माध्यमातून सोप्या व लवचिक कर्ज सुविधेची मदतही येथे उपलब्ध आहे. ग्राहकांच्या पूर्ण समाधानासाठी विश्वासार्ह आणि उत्कृष्ट विक्रीनंतरची सेवा देण्यावर शोरूमचा भर असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले.

याशिवाय जुन्या वाहनाला सर्वोत्तम किंमत देऊन विशेष एक्स्चेंज ऑफरचा लाभही ग्राहकांना येथे घेता येणार आहे. त्यामुळे गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वाहन खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी 'श्री सालासार ह्युंदाई' शोरूम एक उत्तम पर्याय ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावे ८०५५१०५०००.

# गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदी करा आणि दुबई ट्रिप जिंकण्याची संधी मिळवा

### शिवम टीव्हीसची ग्राहकांसाठी खास ऑफर



शिवम टीव्हीसची वाहन खरेदी करा आणि दुबई ट्रिप जिंकण्याची संधी मिळवा अशी ग्राहकांसाठी खास ऑफर ठेवण्यात आली आहे.

नगर – गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर शहरातील झोपडी कॅन्टीन समोरील शिवम टीव्हीस शोरूम ग्राहकांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहे. गुढीपाडव्याच्या निमित्ताने वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी येथे खास ऑफर जाहीर करण्यात आली आहे. याअंतर्गत वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉच्या माध्यमातून कुटुंबासह दुबई ट्रिप जिंकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय प्रत्येक वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना स्पीन ॲण्ड विन उपक्रमाद्वारे विविध आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधीही मिळणार आहे.

मागील ३३ वर्षांपासून वाहन विक्री आणि विश्वासार्ह सर्व्हिस देत शिवम टीव्हीसने ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. टीव्हीस कंपनीचे सर्व मॉडेल्स या शोरूममध्ये उपलब्ध असून ग्राहकांना त्यांच्या पसंतीनुसार वाहनांची निवड करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

गुढीपाडव्याच्या प्रसंगी ग्राहकांनी आपल्या आवडीची टीव्हीस कंपनीची गाडी खरेदी करण्यासाठी शिवम टीव्हीस शोरूमला भेट द्यावी, असे आवाहन शोरूमच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी ९१३००३०००२ / ९१३००३०००३ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रभाषा हिंदी परिक्षेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचा १००% निकाल

नगर – 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे आयोजित' हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेत अहिल्यानगर येथील 'सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. दरवर्षी इयत्ता सहावी ते नववी या वर्गांसाठी वेगवेगळ्या स्तरावर ही परीक्षा आयोजित केली जाते. सप्टेंबर २०२५ ला ही परीक्षा विदयालयात घेण्यात आली होती. त्यात विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.



राष्ट्रभाषा हिंदी परिक्षेत यश मिळविणारे सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी.

परीक्षेचा निकाल : विशेष योग्यता प्राप्त – ३ विद्यार्थी, प्रथम श्रेणी – ५६ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी– ४६, तृतीय श्रेणी –३० विद्यार्थी.

या परीक्षेस एकूण १४८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी १३४ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली,त्यात सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्थेचे पदाधिकारी, माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या गीता तांबे आणि प्राथमिक च्या मुख्याध्यापिका कंचन पापडेजा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला.

विद्यार्थ्यांना अभिनंदन करताना गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांना भवितव्यासाठी या परीक्षेचे महत्त्व समजावून सांगितले.

विद्यालयामार्फत अशा अनेक स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात. त्यासाठी प्राचार्या गीता तांबे नेहमीच विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करत असतात. व वेळोवळी प्रोत्साहन देत असतात.

यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या हिंदी विषय शिक्षिका सुमन कदम आणि सौ. वैशाली शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती नियोजनासाठी २२ मार्चला अहिल्यानगरमध्ये कार्यकर्त्यांची बैठक

नगर – अहिल्यानगर शहरातील तमाम आंबेडकरी चळवळीतील सामाजिक संघटना, रिपब्लिकन पक्षाचे विविध गट तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक २२ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक दुपारी १ वाजता सिद्धीबाग येथील दादासाहेब रूपवते विद्यालय व ज्युनियर कॉलेज येथे होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात व जल्लोषात साजरी करण्याच्या पार्श्वभूमीवर या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीचे नियोजन, मिरवणुकीसाठी आवश्यक परवानग्या, सुरक्षा व्यवस्था, मार्ग नियोजन तसेच विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा व विचारविनिमय करण्यात येणार आहे.

अहिल्यानगर शहरातील आंबेडकरी चळवळीतील सर्व सामाजिक संघटना, विविध रिपब्लिकन पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच जयंती उत्सव साजरा करणाऱ्या मंडळांचे प्रतिनिधी यांनी या बैठकीस उपस्थित राहून जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी आपले सहकार्य द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

ही बैठक तमाम आंबेडकरी समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आली असून शहरातील सर्व सामाजिक, राजकीय व आंबेडकरी विचारांच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.


भाजपा महिला आघाडी आयोजित मिलेट पाककृती स्पर्धेचे उद्घाटन करताना शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते.

# शहर भाजपच्या मिलेट पाककृती स्पर्धेत महिलांनी बनवले पौष्टिक, रुचकर पदार्थ

नगर – ज्वारी, बाजरी, रागी, नाचणी, कांगणी, वरई इत्यादी भरडधान्यांपासून बनवलेल्या पौष्टिक व रुचकर पदार्थांची अनोखी पाककृती स्पर्धा नुकतीच अहिल्यानगरमध्ये रंगली. निमित्त होते शहर भाजपच्या महिला आघाडी आयोजित मिलेट पाककृती स्पर्धेचे. या अनोख्या खाद्यपदार्थ स्पर्धेस महिलांनी प्रतिसाद देत अनेक पौष्टिक, रुचकर पदार्थ स्वतः बनवले.

महिला दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या या मिलेट पाककला स्पर्धेचे उद्घाटन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी गटनेत्या शारदा ढवण, महिला बालकल्याण विभागाच्या सभापती दिपाली बारस्कर, नगरसेविका वंदना ताठे, सोनाबाई शिंदे, शहर सरचिटणीस महेश नामदे, निखिल वारे व अशोक गायकवाड, रोहन सानप, नगरसेवक महेश लोंढे, श्री. जाधव, कैलास गर्जे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष प्रिया जानवे यांनी केले. यावेळी महिला पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व स्पर्धक उपस्थित होते.

महिला विधीज्ञ धनश्री खेतमाळस यांनी महिलांना कायदेविषयक विषयक माहिती देऊन जनजागृती केली.

यावेळी सुजाता औटी, संध्या पावसे, अर्चना बनकर, स्वाती पवळे, राखी आहेर, ज्योती दांडगे, कालिंदी केसकर, लीला अग्रवाल, रेणुका करंदीकर, स्वाती शीरसुल, प्रतीक्षा रसाळ, प्रज्ञा जोशी, अलका मुंदडा यांच्यासह स्पर्धेच्या परीक्षक धनश्री खर्डे व राणी सोनवणे उपस्थित होत्या.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे – प्रथम उज्वला आभाने – पदार्थ ज्वारीच्या पिठाची शेव, मोदक, लापशी व धिरडं. द्वितीय पद्मजा टेकाडे – पदार्थ ज्वारीचे अनारसे व ज्वारीचे कटलेट. तृतीय स्मिता गांधी – पदार्थ राजगिरा राळेभात, ज्वारीची घाट व नाचणी बर्फी. उत्तेजनार्थ सोनल भुतकर – पदार्थ कंगनी मिलेट कटलेट व कविता छप्पनिया पदार्थ मिलेट मॅजिक पिझ्झा.

# समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत महिलांचे योगदान दिशादर्शक

## डॉ. सुरेश पठारे यांचे प्रतिपादन; सीएसआरडीत जागतिक महिला दिनानिमित्त महिला सन्मान व प्रेरणादायी मुक्त संवाद कार्यक्रम

नगर – समाजकार्याचा मूलाधार म्हणजे मानवी संवेदना, समता आणि सामाजिक न्याय. महिलांनी आरोग्य, शिक्षण, समाजसेवा, पत्रकारिता, कला आणि विविध क्षेत्रांत दिलेले योगदान समाजपरिवर्तनाची दिशा ठरवणारे आहे. अशा कर्तृत्ववान महिलांचा गौरव करणे म्हणजे केवळ त्यांचा सन्मान नसून समाजातील नव्या पिढीला मूल्याधिष्ठित कार्यासाठी प्रेरणा देण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन डॉ. सुरेश पठारे यांनी केले.


सीएसआरडी येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिला सन्मान व प्रेरणादायी मुक्त संवाद कार्यक्रम झाला.

ते पुढे म्हणाले की, सीएसआरडीच्या समाजकार्य अभ्यासक्रमाला ५० वर्षे पूर्ण होत असून सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यापुढेही अशा स्वरूपाचे प्रेरणादायी कार्यक्रम सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्थेच्या विद्यार्थिनी मंच आणि माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त प्रेरक महिला सन्मान व प्रेरणादायी मुक्त संवाद कार्यक्रम संस्थेच्या प्रांगणात नुकताच झाला. विविध क्षेत्रांत सामाजिक बांधिलकीने कार्य करणाऱ्या दहा प्रेरक महिलांचा मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. यामध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. मर्सिया वॉरेन, माजी मुख्याधीपिका सुशीलाताई मोडक, नीलिमा बंडेलू, रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनीच्या कुंदा हळबे, शेवगाव येथील नित्यसेवा हॉस्पिटलच्या सिस्टर फ्रान्सिस्का, माऊली सेवा प्रतिष्ठानच्या डॉ. सुचेता धामणे, पत्रकार शिल्पा रसाळ, स्नेहांकुरच्या संस्थापिका प्राजक्ता कुलकर्णी, अभिनेत्री शमीम अली आणि सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्ष जागृती ओबेरॉय यांचा समावेश होता. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे, सीएसआरडी माजी विद्यार्थी संघाचे सचिव सी. व्ही. नांदेडकर, सदस्य डॉ. के. के. कनोजिया आदी उपस्थित होते.

यावेळी प्रेरणादायी मुक्त संवाद या सत्रात शिल्पा रसाळ यांनी शमीम अली आणि डॉ. सुचेता धामणे यांच्याशी मुलाखत स्वरूपात संवाद साधला. या संवादामध्ये त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात, संघर्षमय प्रवास, समाजासाठी कार्य करण्यामागील प्रेरणा, मूल्याधिष्ठित कार्यपद्धती आणि समाजपरिवर्तनाची दृष्टी याविषयी मनमोकळेपणाने विचार मांडले. या संवादामुळे उपस्थितांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू जवळून जाणून घेण्याची संधी मिळाली.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. मर्सिया वॉरेन यांनी महिलांचे नेतृत्व, संवेदनशीलता आणि समाजपरिवर्तनातील त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका याविषयी मार्गदर्शन केले, त्यांनी सांगितले की, महिलांचे सामाजिक भान आणि सेवावृत्ती समाजातील अनेक प्रश्नांवर सकारात्मक बदल घडवू शकते.

आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. सुरेश पठारे म्हणाले, समाजकार्याचा मूलाधार म्हणजे मानवी संवेदना, समता आणि सामाजिक न्याय. महिलांनी आरोग्य, शिक्षण, समाजसेवा, पत्रकारिता, कला आणि विविध क्षेत्रांत दिलेले योगदान समाजपरिवर्तनाची दिशा ठरवणारे आहे. अशा कर्तृत्ववान महिलांचा गौरव करणे म्हणजे केवळ त्यांचा सन्मान नसून समाजातील नव्या पिढीला मूल्याधिष्ठित कार्यासाठी प्रेरणा देण्याचा प्रयत्न आहे. ते पुढे म्हणाले की, सीएसआरडीच्या समाजकार्य अभ्यासक्रमाला ५० वर्षे पूर्ण होत असून सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यापुढेही अशा स्वरूपाचे प्रेरणादायी कार्यक्रम सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी झपके यांनी केले. वैशाली पठारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, डॉ. प्रदीप जारे, सॅम्युअल वाघमारे, नाजीम बागवान, ट्विंकल ईश्वरी तसेच विद्यार्थिनी मंच आणि माजी विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थी, माजी विद्यार्थी, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित होते.

# नवयुवकांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून भापकरांचे कार्य पुढे न्यावे

## रामचंद्र दरे यांचे प्रतिपादन; कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मुंबई विद्यापीठ प्रथम


कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी रामचंद्र दरे, डॉ. विवेक भापकर, डॉ. एम. एम. तांबे, प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे, प्रा. विजयकुमार शिंदे आदी उपस्थित होते. (छाया – समीर मन्यार)

नगर – कॉ. बापूसाहेब भापकर यांचे सामाजिक योगदान अतुलनीय असून अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या रोपट्यापासून वटवृक्षात रूपांतर करण्यामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. नवयुवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक जबाबदारी पार पाडली, तर राज्य व राष्ट्राचे कल्याण होईल. तसेच युवकांनी व्यसनांपासून दूर राहून स्वनिर्मितीत भर द्यावी, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी केले.

न्यू लॉ कॉलेजतर्फे आयोजित १९ वी कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे व प्रा. विजयकुमार शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. विवेक भापकर म्हणाले की, न्यू लॉ कॉलेज गेल्या एकोणीस वर्षांपासून सातत्याने ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करत असून कॉ. बापूसाहेब भापकर यांचे विचार संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविण्याचे कार्य करत आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्ट वक्तृत्व कौशल्य विकसित होऊन भविष्यातील विचारवंत व सक्षम वकील घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. स्पर्धकांनी तसेच परीक्षक प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर व प्रा. ए. एस. सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. अतिथी परिचय प्रा. ए. ए. म्हस्के यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे–कांडेकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी मानले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांतील २५ संघांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अनुराधा मते, प्रा. अतुल म्हस्के, डी. बी. मोरे, ग्रंथपाल सौरभ साबळे, प्रा. आर. डी. भवाळ, अधीक्षक हेमा कदम तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेचा निकाल : प्रथम पारितोषिक विवेक भापकर (विश्वस्त) यांच्या तर्फे कॉ. बापूसाहेब भापकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. यामध्ये यश रवींद्र पाटील व अभय कृष्णाकांत आळशी (मुंबई विद्यापीठ, मुंबई) यांनी प्रथम क्रमांक पटकावत रोख ₹७००१ व करंडक मिळविला.

द्वितीय पारितोषिक रामचंद्र दरे (विश्वस्त, अ.जि.म.वि.प्र. समाज) यांच्या तर्फे कै. हरिभाऊ दरे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. संपदा मच्छिंद्र लांडगे व हुमेरा अन्सारी (न्यू लॉ कॉलेज, अहिल्यानगर) यांनी द्वितीय क्रमांक पटकावत रोख ₹५००१ व करंडक मिळविला.

तृतीय पारितोषिक डॉ. एम. एम. तांबे यांच्या तर्फे कै. मल्हारी तांबे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. अनिकेत रामा आणारे व रोहन ज्योतिराव कवडे (कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे) यांनी तृतीय क्रमांक पटकावत रोख ₹४००१ व करंडक मिळविला.

चतुर्थ पारितोषिक डॉ. आर. बी. दुसुंगे यांच्यातर्फे कै. मनीषा दुसुंगे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात आले. उत्कृष्ट वक्ता म्हणून पूजा अनिल कोरडे (न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव) व कार्तिकी रामहरी पवार (रेसिडेन्शियल ज्युनियर कॉलेज, अहमदनगर) यांना विभागून रोख ₹१५०१ व चषक देण्यात आले.

उत्तेजनार्थ पारितोषिक कॉ. एकनाथराव भागवत यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कॉ. भाऊसाहेब थोटे यांच्या तर्फे देण्यात आले. अमोल रामचंद्र गोळे (सौ. निर्मलाताई थोपटे कॉलेज, भोर – पुणे) यांना रोख ₹१००१ देऊन गौरविण्यात आले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## पौर्णिमा

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

शीतलता आणि सुंदरता यांचा एक आल्हादकारी सुंदर समन्वय म्हणजे पौर्णिमा. भगवंताने गीतेत 'नक्षणांमहं शशी' असे सांगत परमात्म्याच्या शांत तत्त्वाची आणि सौंदर्याची विभूती म्हणून चंद्राला गौरविले आहे. पौर्णिमेचा चंद्र हा तर पूर्णत्वाचा आविष्कार. प्रसन्नतेचे पूर्णत्व जणू पौर्णिमा आहे. महाकवी, संत, प्रज्ञावंत यांनी चंद्र आणि पौर्णिमा यांचे रूपक ठायी ठायी मांडले आहे. ज्ञानदेवांनी सद्गुरूंची प्रसन्नता चंद्राच्या रूपकातून मांडली आहे. ज्ञानदेव म्हणतात,

**'अगा विश्वैकधामा ।**
**तुझा प्रसाद चंद्रमा ।**
**करून मज पूर्णिमा ।**
**स्फूर्तीची जी।।'**
**– ज्ञाने. १४– २३**

हे विश्वैकधामा, तुझा प्रसादचंद्रमा मला स्फूर्तिची पौर्णिमा करो आणि नवरसांचे सागर भरवीत, विवेकवल्लीची लावणी करीत माझ्याकडून या भावार्थालाही खरे पूर्णत्व लाभो. एकदा का पौर्णिमच्या चंद्राच्या शांत, अमृतत्त्वाचा अनुभव घेतला की तृप्तीचेही पूर्णत्व लाभते. प्राचीन काव्यात चकोर पक्षी आपल्याला ठायी ठायी आढळतो. तो चकोर फक्त पौर्णिमेच्या चंद्राचे चांदणे पिऊनच जगतो अशी कल्पना आहे.

**ज्ञानदेव पुढे म्हणतात,**
**'सांगे कुमुदळाचेनि ताटे ।**
**जो जेविला चंद्रकिरणे चोखटे ।**
**तो चकोरू काई वाळवंटे ।**
**चुंबितु असे ।।**
**– ज्ञाने. ४–१०७**

ज्याने चंद्रविकासी कमळाच्या पौर्णिमेच्या चंद्रकिरणांचा आस्वाद घेतला त्याला इतर काही खावे अशी इच्छा तरी होईल का? ही पूर्णत्वाची आणि तृप्तीचेही पूर्णत्व पौर्णिमेचा चंद्रच देऊ शकतो.

खरे तर या पूर्णत्वाची अनुभूती आपल्या जीवनाला लाभावी यासाठी कोजागरी पौर्णिमा आहे. त्यासाठीच या कोजागरी पौर्णिमेची योजना आहे, हे निश्चितच. पूर्णत्वाच्या अनुभूतीचा लाभ सर्वांनी घ्यावा, अशी अपेक्षा आहे. तद्वतच अशी कल्पना आहे की कोजागरीच्या मध्यरात्री लक्ष्मी भूतलावर उतरते आणि 'को जागर्तिती।' या संपन्नतेच्या आनंदाच्या, वैभवाच्या पूर्णत्वासाठी कोण जागे आहे? असे विचारते. या उत्साहाने, प्रफुल्लतेने वरदा लक्ष्मीदेवीचे स्वागत करणे आवश्यक असते. तसे झाले तर संपन्नता, आनंद, वैभवाची प्राप्ती होते. प्रमाद, आळस झटकून कर्मजागृती व्हावी तर आत्यंतिक भोगवासनेला सोडून विषयजागृती व्हावी. अज्ञान संपवून ज्ञानजागृती व्हावी आणि जागले होऊन जागेपणे जगावे हेच खरे मानवी जीवनाचे प्रयोजन होय.

– **किशोर गांधी**

# कॉ. बापूसाहेब भापकरांचे विचार समाजाला पुढे नेणारे दिशादर्शक

## कॉ. सुभाष लांडे यांचे प्रतिपादन; न्यू लॉ कॉलेजमध्ये राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन


न्यू लॉ कॉलेज, अहमदनगर येथे आयोजित १९ व्या कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन कॉ. बापूसाहेब भापकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. (छाया – समीर मन्यार)

नगर – कॉ. बापूसाहेब भापकर यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत मार्गदर्शक आहे. समाजात निरोगी सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांची आज विशेष गरज आहे. भापकरांचे कार्य व विचार समाजाला पुढे नेण्यासाठी दिशादर्शक ठरणारे आहेत, असे प्रतिपादन भाकपचे राज्यसचिव कॉ. सुभाष लांडे यांनी केले.

येथील न्यू लॉ कॉलेजमध्ये आयोजित १९ व्या कॉ. बापूसाहेब भापकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पा. होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, प्राचार्या डॉ. एम. एम. तांबे, ॲड. सुभाष भोर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

कॉ. लांडे पुढे म्हणाले, आजच्या काळात माणसे अधिक आत्मकेंद्रीत होत आहेत. नव्या पिढीने केवळ मतदानापुरते राजकारण न पाहता व्यापक सामाजिक दृष्टीकोन ठेवून काम करण्याची गरज आहे.

ॲड. विश्वासराव आठरे पा. म्हणाले की, भारतात गरीब–श्रीमंत दरी वाढत असून कष्टकरी व शेतकरी वर्गाला पुढे आणण्यासाठी कॉ. बापूसाहेब भापकरांचे विचार समाजात रुजविणे आवश्यक आहे. या देशात वैचारिक चळवळ निर्माण करून सर्वसामान्यांच्या हितासाठी तरुण वर्गाने, विशेषतः वकिलांनी, पुढाकार घेऊन सामाजिक बदल घडवून आणावा.

स्वागत प्राचार्या डॉ. एम. एम. तांबे यांनी केले. प्रास्ताविकात प्रा. डॉ. रामेश्वर दुसुंगे यांनी स्पर्धेचा आढावा घेत स्पर्धेचा दर्जा वर्षागणिक उंचावत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कॉ. बापूसाहेब भापकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पाहुण्यांची ओळख प्रा. डी. बी. मोरे यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. प्रियंका खुळे–कांडेकर यांनी केले. प्रा. पूनम वडडेपल्ली यांनी आभार मानले.

स्पर्धेसाठी राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील महाविद्यालयांचे स्पर्धक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या अधीक्षक हेमा कदम, प्रा. अनुराधा मते, प्रा. अतुल म्हस्के, ग्रंथपाल प्रा. सौरभ साबळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेतर्फे २२ मार्चला संघ निवड चाचणीचे आयोजन

नगर – महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना व नाशिक जिल्हा बास्केटबॉल संघटना यांच्या वतीने ३१ मार्च ते ४ एप्रिल रोजी होणाऱ्या अठरा वर्षे गटाखालील गटातील राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन नाशिक येथे होणार आहे तरी या स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्ह्याचा संघ पाठवायचा आहे त्याकरिता २२ मार्च रोजी संध्याकाळी ३:३० वाजता अहमदनगर बास्केटबॉल संघटनेच्या वतीने निवड चाचणीचे आयोजन केलेले आहे तरी सर्व मुलांनी व मुलींनी निवड चाचणीसाठी येताना आपले आधार कार्ड झेरॉक्स, जन्मदाखला झेरॉक्स व निवड चाचणी फी रुपये ३०० सोबत आणणे आवश्यक आहे निवड चाचणीसाठी सावेडीतील प्रोफेसर कॉलनी येथील जॉगींग ट्रॅक येथे उपस्थित रहावे.

निवड चाचणीसाठी सत्यम देवळालीकर ९२२६३१२५५६ व सचिन भापकर ९०२८९९०३९७ या क्रमांकावर संपर्क करावा तरी निवड चाचणीसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे आवाहन अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव कैलास शानबाग व सहसचिव संजय ढोणे यांनी केले आहे.

# पर्यावरण संरक्षण आणि विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासाठी राज्य सरकारने कठोर भूमिका घ्यावी : गोरक्षनाथ गवते

## पाठपुरावा करुनही दखल घेतली जात नसल्याने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा; प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप



नगर – राज्यातील पर्यावरण संरक्षण आणि सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण व उच्चशिक्षण कायमस्वरूपी मोफत उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा करणारे गोरक्षनाथ विश्वनाथ गवते (जय मल्हार) यांनी प्रशासन, राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. या संदर्भात त्यांनी आजपर्यंत १६ वेळा पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे सांगत शासनाने तातडीने दखल घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गवते यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, पर्यावरण संरक्षणासाठी शासनाने अनेक नियम आणि कायदे केले असले तरी ते प्रत्यक्षात फक्त कागदावरच दिसून येतात. देशभरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असून लाखो प्राणी–पक्ष्यांची बेकायदेशीर शिकार आणि हत्या सुरू आहे. यामुळे जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत असून अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

याशिवाय शेतीत रासायनिक खते व विषारी औषधांचा वाढता वापर, औद्योगिक प्रदूषण, नदी–नाल्यांमध्ये सोडले जाणारे केमिकलयुक्त पाणी आणि हवेतील वाढते प्रदूषण यामुळे माती, पाणी व हवा दूषित होत असल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे. यामुळे जमिनीचा पोत खराब होत असून शेती नापीक होत आहे, तर पिण्यायोग्य पाणी व स्वच्छ हवा मिळणेही कठीण झाले आहे, असे त्यांनी नमूद केले.

शहरांमधील कचरा व्यवस्थापनाचाही प्रश्न गंभीर बनत चालल्याचे गवते यांनी सांगितले. अनेक नागरिक प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये घरातील कचरा रस्त्याच्या कडेला किंवा सार्वजनिक ठिकाणी फेकून देतात. त्यामुळे रस्त्यालगत मोठमोठे कचऱ्याचे ढिगारे निर्माण होत असून दुर्गंधी व अस्वच्छता वाढत आहे. या कचऱ्यात अन्न शोधताना जनावरांच्या पोटात प्लास्टिक जात असल्याने अनेक गायी व इतर प्राणी मृत्युमुखी पडत असल्याचे त्यांनी नमूद केले.


पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी शासनाने कठोर कायदे करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. कोणतीही व्यक्ती बेकायदेशीर वृक्षतोड करत असल्यास तिच्यावर कठोर कारवाई व्हावी. एखादे झाड तोडण्याची गरज असल्यास शासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करावे आणि त्याआधी किमान पाच ते सात झाडे लावून त्यांचे संगोपन करणे अनिवार्य करावे, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच गावागावांत स्मशानभूमींमध्ये विद्युत दाहिनीची व्यवस्था करावी, जेणेकरून मृतदेहांच्या अंत्यसंस्कारासाठी मोठ्या प्रमाणावर होणारी बेकायदेशीर वृक्षतोड थांबले नाही तर गावागावा मधून जाणाऱ्या लाकडी ओंडकेच्या गाड्या या जिल्हाधिकारी ऑफिस समोर कायमच्या पार्किंग केल्या जातील यासाठी वेळप्रसंगी जागतिक पर्यावरण विकास सरकार कायदा हातात घेण्याचे काम करेल यासाठी प्रशासनाने राज्य शासन केंद्र शासनाने प्रामुख्याने लक्ष द्यावे अन्यथा कठोर पाऊल उचलण्याचे काम जागतिक पर्यावरण विकास सरकारकडून होईल. पृथ्वीवरील ऑक्सिजनचे प्रमाण घटत असून पर्यावरण संतुलन बिघडत चालले आहे. यामुळे भविष्यात मानवजातीस गंभीर संकटांचा सामना करावा लागू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.

पर्यावरण जनजागृतीसाठी गवते गेल्या अनेक वर्षांपासून विविध उपक्रम राबवत आहेत. एक विद्यार्थी एक झाड, एक व्यक्ती एक झाड, प्लास्टिक बंदी, वृक्षतोड बंदी, शिकार बंदी, व्यसनमुक्ती, ग्रामस्वच्छता, विषमुक्त शेती, पाणी आडवा–पाणी जिरवा, जल–वायू–भू प्रदूषण रोखणे अशा अनेक अभियानांद्वारे समाजप्रबोधन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी प्रेम व जाणीव निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याच विद्यार्थ्यांमधून उद्याचे जबाबदार आणि पर्यावरण रक्षणासाठी सज्ज नागरिक घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, शासनाने पर्यावरण संरक्षणाबाबत ठोस निर्णय घेतले नाहीत तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही गवते यांनी दिला आहे. तसेच देशातील प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेऊन स्वच्छ, सुंदर आणि निरोगी भारत घडवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पै.खाशाबा जाधव सर्वोत्कृष्ट खेळाडूचा सन्मान सारडा महाविद्यालयाचा विद्यार्थी मंगेश ताकमोगे याला देण्यात आला.

# सारडा महाविद्यालयाचा खेळाडू मंगेश टाकमोगेचा पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मान


नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा २०२४ – २५ वर्षाचा पै.खाशाबा जाधव सर्वोत्कृष्ट खेळाडूचा सन्मान पेमराज सारडा महाविद्यालयातील विद्यार्थी मंगेश ताकमोगे याला प्रदान करण्यात आला. पुणे विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते खेळाडू मंगेश ताकमोगे याच्या वतीने आई, वडील आणि भाऊ, तसेच सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संजय धोपावकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सुवर्णपदक, रुपये ५१ हजार रोख आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या समारंभास अर्जुन पुरस्कार विजेत्या श्रीमती कविता राऊत, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते राजीव जालनापूरकर प्रमुख उपस्थितीत होते.

खेळाडू मंगेश टाकमोगे हा सारडा महाविद्यालयात एम. कॉम. द्वितीय वर्षात शिकत आहे.

खेळाडू मंगेश ताकमोगे या सायकलपटूने या आधीही सायकलिंगच्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी मध्ये वैयक्तिक स्प्रिंट इव्हेंट मध्ये सिल्वर मेडल, टीम स्प्रिंट इव्हेंट मध्ये ब्राँझ मेडल अणि केरिंग या इव्हेंट मध्ये सिल्वर मेडल अशा तीन पदकांची कमाई सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला आणि सारडा महाविद्यालयास मिळवून दिली आहे. तसेच खेलो इंडिया मध्ये एक गोल्ड, एक सिल्वर आणि ऑल इंडिया युनिव्हर्सिटी मध्ये दोन सिल्वर आणि एक ब्रांझ अशी पाच मेडल मिळवून दिले.

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी आणि ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी खेळाडू मंगेश ताकमोगे या विद्यार्थ्याचे आणि प्राचार्यांचे अभिनंदन केले आहे.




आरोग्यम बहुउद्देशीय फाउंडेशनतर्फे अरणगाव येथील गरजवंत विद्यार्थ्यांना सायकल वाटप करताना पदाधिकारी.

# गरजवंत विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

नगर – आरोग्यम बहुउद्देशीय फाउंडेशनतर्फे एक हात मदतीचा शाळा जवळ करण्यासाठीचा या उपक्रमाच्या माध्यमातून अरणगाव येथील गरजवंत विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले.

त्यासाठी वापरत नसलेल्या सायकल जमा करून त्या दुरुस्त करून गरजवंत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यामुळे शिक्षणासाठी व भविष्यासाठी त्यांना प्रेरणा मिळेल. यावेळी आरोग्यम बहुउद्देशीय फाउंडेशन चे अध्यक्ष कोमल घोडके, श्रद्धा घोडके, मनोज कापरे, मुकुंद घोडके, संस्कार क्लासेस, संस्कार प्ले ग्रुप व नर्सरी स्कूल संचालिका प्रा. सौ. अमृता देवकर, प्रा.अमोल देवकर उपस्थित होते. या उपक्रमात कोणाला सायकल द्यायची असेल तर ९२७२७४००३७ वर संपर्क साधावा, असे आवाहन फाउंडेशनच्या संचालिका सौ कोमल घोडके यांनी केले आहे.

# अरणगाव शाळेच्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्काराने उपस्थित मंत्रमुग्ध


अरणगांव शाळेच्या स्नेहसंमेलनात नृत्याविष्कार सादर करताना विद्यार्थी.

नगर – जिल्हा परिषद अरणगांव प्राथमिक केंद्र शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. यामध्ये समाज प्रबोधन पर संस्कृतिक नृत्य सादर करून विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांची व पालकांची मने जिंकली.

अरणगाव केंद्र शाळेने तालुक्यात नव्हे तर जिल्ह्यातही गुणवत्ता व विविध उपक्रमातही नावलौकिक मिळवला आहे. अवतार मेहेरबाबा ट्रस्टने मुलांसाठी बांधून दिलेल्या भोजन कक्षाचे उद्घाटन राजीव प्रसाद यांच्या हस्ते करण्यात आले. इकबाल शेख यांनी ऑफिससाठी एक मोठे कपाट दिले. प्रवीण अकोलकर यांनी शाळेचे नाव ॲरक्रिलिक मध्ये स्वखर्चाने करून दिले. शरद ढमढेरे यांनी शाळेसाठी शोभिवंत झाडे दिली. जय दळवी यांनी शाळेसाठी एक संगणक भेट दिला त्याचप्रमाणे सारंग गहिले यांनीही आपल्या वाढदिवसानिमित्त एक संगणक भेट दिला. तसेच लहू ढमढेरे, सारंग गहिले, राहुल दळवी, मिलन पांडे व प्रशांत मतकर यांनी शाळेसाठी एक संगणक भेट दिला. शाळेने संगणकासाठी पालकांना आवाहन केले असता ६२ हजार रुपये जमा झाले.

या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके, मेहेरबाबा ट्रस्टचे ट्रस्टी राजीव प्रसाद, लोकनियुक्त सरपंच पोपट पुंड, उपसरपंच प्रतिभाताई थोरात, ग्रामपंचायत सदस्य प्रकाश पोटे, किरण गांगुर्डे, सर्व कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन सर्व सदस्य, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद दळवी, उपाध्यक्ष गहिनीनाथ पुंड, शिक्षण प्रेमी अर्जुन पुंड, मोहन गहिले, मोहन पुंड, सुरेश जाधव, राहुल कांबळे, प्रतिक्षा पुंड, माजी सरपंच स्वातीताई गहिले, मोहिनी जाधव अंजुम सय्यद, स्वाती शिंदे यांचे सहकार्य लाभले. यावेळी जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनाचे पदाधिकारी ही उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा लहाकर यांनी केले. सूत्रसंचालन लहू आजबे व नवनाथ वाळके यांनी केले. सौ. संगीता कदम यांनी आभार मानले. शाळेतील उपाध्यापिका कृपा कदम, महेश धामणे, सौ. अलका दळवी, ज्योती कदम, सौ. गिरिजा बनकर – गारुडकर, कमल गवळी, संगीता शेळके या सर्वांचे सहकार्य लाभले.



नगर जल्लोष तर्फे नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## नगर जल्लोष तर्फे नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

नगर - महिला दिन आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुण्यदिन आणि छत्रपती संभाजी राजे बलिदान दिन या सर्व स्मृतींचे औचित्य साधून नगर जल्लोष परिवारातर्फे महापौर सौ. ज्योती गाडे आणि नगरसेविका गीतांजली काळे यांचा सत्कार त्याबरोबरच येणाऱ्या १ मे या महाराष्ट्र दिनी गेल्या पंधरा वर्षापासून सातत्याने कार्यरत असलेल्या नगर जल्लोष परीवारा तर्फे जॉगिंग पार्क प्रोफेसर कॉलनी चौक येथे नियोजित केल्या गेलेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचा देखावा आणि सांस्कृतिक कार्यक्रम (इव्हेंट) याच्या नियोजित कार्यक्रम पत्रिकेचे अनावरण नियोजन समितीचे प्रमुख सुहासभाई मुळे, नगर जल्लोषचे अध्यक्ष सागर बोगा, उपाध्यक्ष गुंजन शिंगवी, नगरसेवक दत्ता गाडळकर, डॉ. अविनाश मोरे, लौकिक शिंगवी, मुकुल गंधे, उद्योजक मोहन जोशी, संजय शिंगवी, छावा संघटनेच्या अध्यक्षा सुरेखाताई सांगळे यांच्या उपस्थितीत पार पडले.

यावेळी छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेकाच्या महाराष्ट्रात प्रथमच सादर होणाऱ्या या सांस्कृतिक आणि पारंपरिक कार्यक्रमाला सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. असे महापौर सौ. ज्योती गाडे यांनी जाहीर केले.

महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे यावेळी संपूर्ण महाराष्ट्राला १२८३ कोटी रुपये नियोजन निधी उपलब्ध करण्याची तरतूद करण्यात आली आहे त्या अंतर्गत अहिल्यानगर शहरामध्ये प्रथमच भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित करून स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे सुहासभाई मुळे यांनी सांगितले,

यावेळी सौ. पल्लवी बोगा, सौ. किरण खोडे, सौ.सपना वल्लाल, सौ. प्राजक्ता बोबडे, वर्षा सुरकुटला, सौ.मोहिनी गुंडू, सौ. आरती बोगा, विद्या शिवरात्री, सौ. सुषमा बोगा यांच्या हस्ते नगरसेवक व महापौरांचा सत्कार करण्यात आला.

स्थानिक कलाकार संतोष पानसरे, सुलतान अहमद, रामनाथ गव्हाणे, जयंत पाठक, राजेंद्र शहाणे, राजू क्षेत्रे इत्यादी कलाकार उपस्थित होते.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर

### सुवालाल बोथरा यांचे प्रतिपादन; मेंदुविकार तपासणी व उपचार शिबीरात ८२ रुग्णांची तपासणी



आनंदऋषीजी म.सा. यांच्या पुण्यस्मरणानिमित्ताने तपासणी व उपचार शिबाराचे उदघाटन करताना सुवालाल बोथरा. (छाया - उदय जोशी)

नगर - ज्याप्रमाणे माणूस मंदिरात गेल्यानंतर आपले सर्व दुःख विसरतो त्याप्रमाणेच या आरोग्य मंदिरात रूग्णांना त्याचा प्रत्यय येत आहे. हॉस्पिटलमध्ये मिळणाऱ्या सोयी-सुविधा व मानसिक आधारामुळे रूग्णांचा आजार लवकर बरा होतो, त्यामुळे आज आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्याचे मंदिर झाले आहे. सातत्याने रुग्णांचा मोठा विश्वास या हॉस्पिटलवर वाढत आहे. दुसऱ्याला मदत करण्याची इच्छा असणे व मदत करणे यात फरक आहे आणि मदत करण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटल करत आहे, असे प्रतिपादन सुवालाल बोथरा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ड सर्जरी सेंटरमध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मरणानिमित्ताने मेंदुविकार तपासणी व उपचार शिबाराचे उदघाटन सुवालाल बोथरा यांच्या हस्ते करण्यात आले. विनोद बोथरा, प्रमोद बोथरा, प्रकाश बोथरा, सुबोध बोथरा, सौ. कविता बोथरा, सौ. संगीता बोथरा, सौ. कल्पना बोथरा, सौ. राखी बोथरा, सौ. रविना बोथरा, सौ. सेजल बोथरा, सौ. सोजल बोथरा, सौ. महिमा बोथरा, सौ. साक्षी बोथरा, आशुतोष बोथरा, मोहक बोथरा, वृषभ बोथरा, श्रेयस बोथरा, निखिल बोथरा, सुधांशु बोथरा, प्रग्यान बोथरा, ऋषीका बोथरा, रिध्दी बोथरा, माही बोथरा, आर्याना बोथरा, हितांशी बोथरा, पियांशी बोथरा, रोहांश बोथरा, डॉ. प्रकाश कांकरीया, माणकचंद कटारीया, सुभाष मुनोत, डॉ.वसंत कटारिया, डॉ. आशिष भंडारी, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, न्यूरोलॉजिस्ट डॉ. अद्वेत गिते, डॉ. वैशाली कदम, मेंदू विकार तज्ञ डॉ. स्नेहा म्हस्के आदी उपस्थित होते.

रविना बोथरा म्हणाल्या, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना मिळत असलेल्या सेवेत विश्वासार्हता आहे. त्यामुळे हे हॉस्पिटल गरीब - गरजु रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत आहे. ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दुःख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्यावतीने होत आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा. फेडरेशन करत असलेल्या या मानवसेवेच्या कार्यात आमचाही खारीचा वाटा आहे यापुढेही आमचे नेहमीच सहकार्य राहील, असे सांगितले.

मोहक बोथरा म्हणाले की, नगरकरांचे भाग्य आहे की, कमी खर्चात गोर-गरीबांना हॉस्पिटल सातत्याने शिबीराच्या माध्यमातून सेवा देत आहे. मोफत शिबीरांच्या माध्यमातून सेवा देण्याचे पुण्य काम आम्हाला मिळाले आहे. सातत्याने सेवा देणे आज शक्य नाही. प्रत्येक गोष्ट महाग होत आहे. त्यामुळे गरीबांना उपचार घेणे अवघड जात आहे. परंतु अशा मोफत शिबीराच्या माध्यमातून आनंदऋषीजी हॉस्पिटलने सातत्याने हे महान कार्य सुरु ठेवले आहे, याचा आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

न्यूरोलॉजिस्ट डॉ. अव्दैत गिते म्हणाले, हॉस्पिटलमध्ये रूग्णासाठी लागणारे सर्व आधुनिक मशिनरी, सर्वोत्तम आयसीयु सेंटर, मॉनेटर असून पेशंटची योग्य प्रकारे काळजी घेतली जाते, पॅरालेसिस यासारख्या रूग्णांनी जर नियमित व्यायाम, गोळ्या व चेकअप केले रूग्ण बरा होतो असे सांगितले.

डॉ. वैशाली कदम म्हणाल्या डोकेदुखी, हाताला मुंग्या येणे यासारखी लक्षणे जाणवल्यास त्या वेळीच तज्ञ डॉक्टरकडून निदान करून घेणे गरजेचे असते त्यामुळे पुढे होणारे धोके टळतात आनंदऋषीजी हॉस्पीटल हे गेली २४ वर्षे रूग्णाना ही सेवा देत असून यंदाचे २५ वर्षात पदार्पण केले आहे सातत्याने ही सेवा देणे सोपे नाही.

शिबीरात ८२ रुग्णांची तज्ञ डॉक्टरांनी तपासणी करुन मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. सतिश लोढा यांनी आभार मानले.

# महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधीचे धनादेश वाटप

### सर्वसामान्यांना उपचारासाठी मोठा आधार : महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन



अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत गरजू नागरिकांना धनादेशांचे वाटप महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया - लहू दळवी)

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत गरजू नागरिकांना धनादेशांचे वाटप महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते करण्यात आले.


यावेळी बोलताना महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, सध्या समाजामध्ये विविध प्रकारचे आजार मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील अनेक व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे आजारपणाकडे दुर्लक्ष करत असतात. त्यामुळे त्या आजाराचे वेळेवर निदान होत नाही आणि पुढे गंभीर आजारांना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेच्या माध्यमातून महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी सुरू करण्यात आला आहे. या निधीच्या माध्यमातून गरजू नागरिकांना आपल्या आजारपणाचे वेळेत निदान करून घेता येते तसेच योग्य वेळी डॉक्टरांकडून उपचार घेण्यास मदत मिळते. यामुळे संबंधित व्यक्तीचे आरोग्य निरोगी आणि सुदृढ राहण्यास मोठा हातभार लागतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपाली बारस्कर, उपसभापती वर्षा सानप, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, नगरसेविका रोशनी त्रिंबके, सुप्रिया जाधव, शेखर देशपांडे तसेच रोहन सानप आदी उपस्थित होते.

यावेळी दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, महापालिकेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेला महापौर दुर्धर वैद्यकीय सहायता निधी हा सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त उपक्रम आहे. आर्थिक अडचणीमुळे उपचार घेणे शक्य नसलेल्या अनेक कुटुंबांना या निधीमुळे मोठा दिलासा मिळत आहे. त्यामुळे गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# आनंदधाम येथे १९ मार्च रोजी मंगल पाठ

### साधु - संतांच्या सानिध्यात नववर्षाची सुरुवात, हा दुग्ध - शर्करा योग



नगर - चैत्र शुध्द प्रतिपदा, हा दिवस गुढीपाडवा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. शालिवाहन संवत्सर चा प्रारंभ होत असलेल्या या दिवशी सुख - समृध्दीचे घरोघरी स्वागत केले जाते. साडे तीन मुहुर्तां पैकी एक मुहुर्त असलेल्या गुढीपाडवा सणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. वसंत ऋतुच्या आल्हाददायक वातावरणात नव चैतन्य, आनंद यांचा दुग्ध - शर्करा योग पाहायला मिळतो.

आनंदधाम च्या पवित्र प्रांगणात असाच दुग्ध - शर्करा योग म्हणजे साधु संतांच्या पावन सानिध्यात नववर्षाची सुरुवात करण्याची संधी मिळणार आहे. राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म सा यांच्या उर्जामय भूमीवर आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा, प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म सा इत्यादी महाराजांच्या पावन सानिध्यात १९ मार्च रोजी सकाळी ९ ते १० आदिनाथ भगवान स्तुति रुप श्री भक्तामर स्तोत्र व अन्य मंगल स्तोत्र पठन, मंगल आशिर्वचन तसेच १० वाजता नववर्ष मंगलपाठ होणार आहे. बंधु - भगिनींनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड च्या वतीने करण्यात आले आहे.



संगीत परीक्षेत यश मिळविलेले एम एम निऱ्हाळी विद्यालयाचे विद्यार्थी.

## एम एम निऱ्हाळी विद्यालयाचे संगीत परीक्षेत यश

पाथर्डी - अखिल भारतीय गांधर्व महामंडळ मुंबई यांच्या वतीने नोव्हेंबर डिसेंबरमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून एम एम निऱ्हाळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

विद्यालयातील अवधूत खेडकर व कु. पुनम सानप या विद्यार्थ्यांनी विशेष योग्यता श्रेणी मिळून केंद्रामध्ये प्रथम आले आहेत. विद्यालयातील एकूण ३० विद्यार्थी संगीत परीक्षेला बसलेले होते. सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. विद्यालयाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रारंभिक गायनामध्ये समृद्धी आंधळे, समृद्धी क्षीरसागर, प्रज्ञा घुले, प्रवेशिका प्रथम मध्ये प्रीतम घुले, वेदांत फुंदे, विवेक बडे, प्रवेशिका पूर्ण मध्ये चैतन्य फुंदे, संग्राम शेवाळे, आदित्य फुंदे हे सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. विद्यालयाचे संगीत शिक्षक, संगीत विशारद, प्रा. जनार्दन बोडखे यांचे मार्गदर्शन लाभले. एकलव्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रतापराव ढाकणे, मा. जिल्हा परिषद सदस्या प्रभावती ढाकणे, विद्यालयाची प्राचार्य संजय घिगे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी अखिल भारतीय गांधर्व संगीत परीक्षेचा अभ्यासक्रम शिकवला जातो. शास्त्रीय गायन, हार्मोनियम, सुगम संगीत, तबला, कथ्थक नृत्य आदी विषयाची तयारी करून घेतली जाते. शाळेचा हा स्तुत्य उपक्रम असल्याची प्रतिक्रिया पालकांनी यावेळी व्यक्त केली.



आनंदऋषिजी नेत्रालयात ग्लॉकोमा जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. या निमित्ताने रुग्ण व नागरिकांमध्ये ग्लॉकोमा या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

## आनंदऋषिजी नेत्रालयात ग्लॉकोमा (काचबिंदू) जनजागृती सप्ताह

नगर - आनंदऋषिजी नेत्रालयात ८ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत ग्लॉकोमा जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. या निमित्ताने रुग्ण व नागरिकांमध्ये ग्लॉकोमा या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

नेत्रालयातील पूर्णवेळ ग्लॉकोमा तज्ज्ञ डॉ. संदीप राणे व डॉ. मिसबाह शेख यांनी ग्लॉकोमा या आजाराविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ग्लॉकोमा हा दृष्टी चोरणारा निःशब्द आजार (Silent Thief of Sight) असून सुरुवातीला कोणतीही स्पष्ट लक्षणे जाणवत नाहीत. त्यामुळे वेळेवर तपासणी व नियमित फॉलोअप केल्यास दृष्टीचे कायमचे नुकसान टाळता येऊ शकते. विशेषतः ४० वर्षांवरील नागरिकांनी नियमित डोळ्यांची तपासणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

आनंदऋषिजी नेत्रालयात ग्लॉकोमा निदानासाठी Zeiss RNFL OCT, Pachymetry, Perimetry यांसारख्या अत्याधुनिक तपासणी सुविधा अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध आहेत. तसेच YAG Capsulotomy सारखे OPD आधारित उपचारही येथे उपलब्ध आहेत. ग्लॉकोमावरील सर्व शस्त्रक्रिया आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ८६८६४०१५१५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन नेत्रालयाच्या वतीने प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड करण्यात आले.

# 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन रिसेंट ट्रेंड्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड मशीन लर्निंग परिषदे'चे अहिल्यानगरच्या न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये उद्घाटन

### कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्रशिक्षण क्षेत्रातील संशोधनाला नवी दिशा



न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये 'NCRT-AIML २०२६' राष्ट्रीय परिषदेत बोलताना प्रा. अरुण गांगर्डे.

नगर - अहिल्यानगर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय (स्वायत्त) येथे आयोजित 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन रिसेंट ट्रेंड्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड मशीन लर्निंग - २०२६' (NCRT-AIML २०२६) या द्वीदिवसीय राष्ट्रीय परिषदेचा उद्घाटन समारंभ १३ मार्च रोजी उत्साहपूर्ण वातावरणात झाला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाच्या प्रायोजकत्वाखाली आयोजित या परिषदेत महाराष्ट्रभरातील संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे विराजमान होते.

परिषदेचे संयोजक प्रा. अरुण गांगर्डे यांनी प्रास्ताविक भाषणात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सध्याची स्थिती आणि भविष्यात अपेक्षित असलेल्या कौशल्यांवर सखोल प्रकाश टाकला. 'कॅसास' (CASAS - Center for Advanced Studies in Applied Sciences) या केंद्राच्या पुढील पाच वर्षांच्या विकासासाठी त्यांनी तयार केलेल्या 'व्हिजन २०३०' या सर्वंकष आराखड्याची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

माजी प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्रा. डॉ. अजित जावकर यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेतून या केंद्राची वाटचाल सुरू असून या कार्यासाठी आपण पूर्णतः समर्पित असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

राष्ट्रीय परिषदेसाठी एकुण ३० पेक्षा जास्त शोध निंबध प्राप्त झाले असुन प्रा. प्रियंवदा पाटील, डॉ. अमित ताकटे, प्रा. मनोज गोबरे आणि विभागातील सर्व प्राध्यापक शोध निंबध वाचनाचे सादरीकरण आणि प्रकाशणाचे काम करीत आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. सागडे यांनी उपस्थितांचे हार्दिक स्वागत करताना महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख प्रभावीपणे मांडला. महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा प्राप्त झाला असून सध्या येथे ३० पदवी, ३२ पदव्युत्तर विभाग आणि १८ संशोधन केंद्रे कार्यरत आहेत. 'कॅसास'ने डेटा सायन्स, प्रिंटिंग टेक्नॉलॉजी आणि क्लाउड कम्प्युटिंग यांसारख्या आधुनिक अभ्यासक्रमांमध्ये घेतलेला पुढाकार विद्यार्थ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग यांसारख्या अत्याधुनिक विषयांवर आयोजित ही परिषद विद्यार्थी आणि प्राध्यापक या दोघांच्याही ज्ञानात मोलाची भर घालेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अवघ्या २१ दिवसांत १५० हून अधिक सहभागींची नोंदणी करून ही राष्ट्रीय परिषद यशस्वीरीत्या आयोजित केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे विशेष अभिनंदन केले आणि भविष्यातील तंत्रज्ञानविषयक उपक्रमांसाठी महाविद्यालयाचा नेहमीच संपूर्ण पाठिंबा राहील, अशी ग्वाही दिली.

संस्थेचे सचिव ॲड. आठरे पाटील यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून दिले. दैनंदिन जीवनातील आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे वाढते महत्त्व, तरुणां-समोरील वाढत्या बेरोजगारीचा प्रश्न आणि उद्योगजगतासाठी कुशल व भविष्यसज्ज मनुष्यबळ तयार करण्यात 'कॅसास'ची अत्यंत महत्त्वाची भूमिका यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

परिषदेचे प्रमुख पाहुणे, गुगलचे स्टाफ टेक्निकल सोल्युशन्स कन्सल्टंट विजयकुमार जंगमशेट्टी यांनी 'आर्किटेक्टिंग द फ्युचर: जनरेटिव्ह एआय आणि क्लाउड इव्होल्यूशन' या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण व्याख्यान दिले. पारंपारिक मशीन लर्निंगपासून जनरेटिव्ह एआयकडे होणाऱ्या महत्त्वपूर्ण स्थित्यंतरावर त्यांनी विशेष भर दिला. पारंपारिक मॉडेल्स केवळ डेटाचे विश्लेषण व वर्गीकरण करतात, तर जनरेटिव्ह एआय नवीन भाषा, कोड आणि आशय निर्माण करण्यास सक्षम असते, हे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. Gemini सारख्या फाउंडेशन मॉडेल्स व क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर (TPUs/GPUs) यांच्या समन्वयाचे महत्त्व त्यांनी विशद केले. आरोग्य क्षेत्रात MedLM सारख्या एआय तंत्रज्ञानाद्वारे इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्ड्स तयार करणे व ग्रामीण भागात बहुभाषिक पेशंट पोर्टल्सद्वारे आरोग्यसेवा सुलभ करणे यावरही त्यांनी प्रकाश टाकला. एआयने चुकीची माहिती पुरवू नये यासाठी RAG (Retrieval-Augmented Generation) तंत्रज्ञान कसे उपयुक्त आहे, हे त्यांनी सोप्या भाषेत मांडले. तंत्रज्ञान सुरक्षित, नैतिक व सर्वसमावेशक असावे यासाठी 'Responsible AI' या संकल्पनेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. भविष्यातील खऱ्या संधी नवीन मॉडेल्स बनवण्यात नसून Application Engineering मध्ये आहेत - क्लाउड प्लॅटफॉर्म्स व APIs च्या माध्यमातून स्थानिक समस्यांवर प्रभावी उपाय विकसित करता येतात, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

अभय रंजन यांनी जनरेटिव्ह एआय आणि त्याच्या व्यापक उपयोजनाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. जनरेटिव्ह एआय हे विद्यमान माहितीवर आधारित मजकूर, चित्रे, संगीत, व्हिडिओ आणि कोड यांसारखी नवीन सामग्री निर्माण करणारे तंत्रज्ञान आहे; पारंपरिक एआय केवळ माहितीचे वर्गीकरण करते, परंतु जनरेटिव्ह एआय प्रत्यक्ष नवनिर्मिती करते, हे त्यांनी उपस्थितांना पटवून दिले. ChatGPT, DALLLE आणि GitHub Copilot यांसारख्या साधनांची उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. Prompt Engineering म्हणजे एआयला सुस्पष्ट व योग्य सूचना देऊन इष्टतम परिणाम मिळवण्याची कला आणि शास्त्र असल्याचे त्यांनी विशद केले. डेटा विश्लेषण, मार्केटिंग आणि मनुष्यबळ विकास यांसारख्या विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये एआयचा प्रभावी उपयोग कसा करता येतो, याची सविस्तर माहिती त्यांनी दिली. अहमदनगरसारख्या निमशहरी भागात न्यू आर्ट्स कॉलेजने 'कासास' अंतर्गत उभारलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रयोगशाळा पाहून त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला. डेटा सायन्स, क्लाउड कॉम्प्युटिंग, बीसीए आणि कॉम्प्युटर सायन्स यांसारखे आजच्या काळाची अत्यंत गरज असणारे अभ्यासक्रम उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी महाविद्यालयाचे, तसेच प्रा. गांगर्डे व त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

अध्यक्षीय मनोगतात रामचंद्र दरे यांनी परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे, प्राध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग यांसारख्या अत्याधुनिक विषयांवरील संशोधन व चर्चा ही देशाच्या भविष्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करत त्यांनी सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, प्रा. अर्जुनराव पोकळे, प्रा. राधाकृष्ण आढाव आधी उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा. गिरीश कुकरेजा यांनी केले. प्रा. दीपाली जगदाळे यांनी आभार मानले. परिषदेच्या सहसंयोजक प्रा. प्रियवंदा पाटील आणि विभागातील सर्व सहकारी प्राध्यापकांनी ही परिषद यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. या राष्ट्रीय परिषदेतून संशोधन, नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षणाची नवी क्षितिजे खुली होतील, अशी अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणूक : मतदारसंघाच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू

## आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यासाठी विविध पथके स्थापन; निवडणुकीच्या कामासाठी २३ समन्वय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

नगर – भारत निवडणूक आयोगाने २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची घोषणा केली असून मतदारसंघाच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून ४ मे रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके, उपजिल्हाधिकारी पुनर्वसन वर्षा पवार, तहसीलदार श्वेता संचेती, नायब तहसीलदार विशाल सदनापूर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, या पोटनिवडणुकीसाठी तात्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून निवडणुकीसाठीची अधिसूचना ३० मार्च रोजी जारी होणार आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ६ एप्रिल आहे. नामनिर्देशन पत्रांची छाननी ७ एप्रिल रोजी होईल, तर उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल आहे. मतदान २३ एप्रिल रोजी होणार असून मतमोजणी ४ मे रोजी केली जाईल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे पूर्वी पूर्ण करणे बंधनकारक आहे.

या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती वर्षा पवार यांची नियुक्ती करण्यात आली असून सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राहुरीचे तहसीलदार अमित पवार काम पाहणार आहेत. नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचे ठिकाण राहुरी तहसील कार्यालय परिसरातील जुने सेतू कार्यालय येथे निश्चित करण्यात आले आहे.


जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

मतमोजणीचे ठिकाण लोकनेते रामदास पाटील धुमाळ आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, राहुरी येथे राहणार असल्याची माहितीही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिली.

या पोटनिवडणुकीसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनामत रक्कम १० हजार रुपये तर अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गासाठी ५ हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे. उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा ४० लाख रुपये राहील.

मतदान प्रक्रियेसाठी एकूण ५९८ बॅलेट युनिट, ६१४ कंट्रोल युनिट आणि ६०६ व्हीव्हीपॅट यंत्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व यंत्रांची प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण झाली असून मतदारांना मतदानाची खात्री व्हावी यासाठी सर्व ईव्हीएमसोबत व्हीव्हीपॅट यंत्र जोडण्यात येणार आहे.

मतदारसंघात एकूण ३७४ मतदान केंद्रे असून १५ मार्च च्या मतदार यादीनुसार एकूण ३ लाख ३३ हजार १८३ मतदार आहेत. त्यापैकी १ लाख ७२ हजार ८५ पुरुष, १ लाख ६१ हजार ९७ महिला आणि ०१ इतर मतदार आहे. तसेच १ हजार ५२ सैनिक मतदार आहेत.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्यासाठी जिल्ह्यात विविध पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. यामध्ये ६ एफएसटी, ६ एसएसटी, ३ व्हीएसटी आणि १ व्हीव्हीटी पथके २४ तास (२४ द ७) कार्यरत राहतील. विनापरवाना खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्तेवर पोस्टर्स लावणे, घोषणा लिहिणे, निवडणूक चिन्हे लिहिणे, कापडी बॅनर अथवा फलक, झेंडे लावणे व इतर कारणाने मालमत्ता विरूपित करण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

नागरिकांच्या सोईसाठी जिल्हा संपर्क केंद्रात १९५० हा टोल–फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून निवडणूक कालावधीत हे केंद्र 24x7 सुरू राहणार आहे.

आदर्श आचारसंहिता उल्लंघनाच्या तक्रारी मोबाईलवरील सी–व्हिजील पद्वारे करता येणार आहेत.

८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेले ज्येष्ठ नागरिक, तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या मतदारांसाठी व कोविड बाधित मतदारांसाठी घरबसल्या मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतपत्रिकेचीही सोय करण्यात आली आहे. ३७४ मतदान केंद्रांवर प्रत्येकी ५ कर्मचारी व १ पोलीस कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे.

राजकीय पक्ष अथवा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी प्रस्तावित केलेल्या जाहिरातींचे प्रमाणीकरण, पेड न्यूज संदर्भातील तक्रारींची तपासणी तसेच प्रिंट, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, केबल नेटवर्क, इंटरनेट, मोबाईल नेटवर्क व सोशल मीडियावरील जाहिरातींचे निरीक्षण करण्यासाठी माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याचबरोबर निवडणूक विषयक विविध कामकाजासाठी २३ समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय मतदार जागरूकतेसाठी स्वीप कार्यक्रम, सर्व ३७४ मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग, तसेच ३ आदर्श मतदान केंद्रे, १ पूर्णपणे महिला संचलित, १ दिव्यांग आणि १ युवा कर्मचाऱ्यांद्वारे संचलित मतदान केंद्र अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहितीही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी दिली.

# बोगस '१०१' दाखल्यांविरोधात जागरण-गोंधळ; संबळ-हलगीच्या गजरात जिल्हाधिकाऱ्यांना इशारा

## सहकार क्षेत्रातील गैरव्यवहार उघड करण्यासाठी छावा संघटना आक्रमक


बोगस '१०१' दाखल्यांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण–गोंधळ करण्यात आले.

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील काही पतसंस्थांकडून बोगस '१०१' वसुली दाखले देऊन कर्जदारांची लूट होत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण–गोंधळ आंदोलन करण्यात आले. पारंपारिक संबळ, हलगी आदी वाद्यांच्या गजरात करण्यात आलेल्या या आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेला. छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, उत्तर जिल्हाध्यक्ष उत्तम पवार, युवा जिल्हाध्यक्ष राम कराळे, तालुका अध्यक्ष दत्ता वामन, पोपटराव दोंदे, विक्रम बेरड, संतोष खामकर, शिवराम पवार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच जागरण–गोंधळ सादर करणारे शाहीर कान्हू सुबे, नारायण सौदागर, जगन्नाथ शिकारी, साहेबराव पाटोळे, लक्ष्मण सौदागर, संतोष शेलार, रावसाहेब दातीर आदींचाही सहभाग होता.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, जिल्ह्यातील काही पतसंस्थांनी '१०१' वसुलीच्या अंमलबजावणीसाठी असलेल्या नियमांचे पालन न करता मोठ्या प्रमाणात दाखले वितरण केले आहे. एनपीएचे निकष डावलून खोट्या खात्यांच्या आधारे वाढीव रक्कम वसूल केली जात असून त्यामुळे कर्जदारांची आर्थिक पिळवणूक होत आहे. या सर्व प्रकरणांचे फेरलेखापरीक्षण करण्यात यावे तसेच संबंधित संस्थांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याची मागणीही त्यांनी केली.

अनेक संस्थांनी बोगस '१०१' वसुली दाखले मिळवून संस्था आणि निबंधक कार्यालयाच्या संगनमताने आर्थिक गैरव्यवहार सुरू असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. सहकार कायद्याचे नियम डावलून एनपीएचे निकष, वसुली अंमलबजावणीची नियमावली आणि इतर कायदेशीर प्रक्रिया धाब्यावर बसवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. काही प्रकरणांत खोट्या खात्यांच्या आधारे वैयक्तिक कर्ज देऊन त्यावर एकाच वेळी '१०१' दाखले काढून बेकायदेशीर वसुली करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला.

याशिवाय वाहन कर्ज प्रकरणांतही नियमबाह्य पद्धतीने वाहन जप्त करून त्याची कायदेशीर प्रक्रिया न राबवता लिलाव केल्याचे प्रकार घडत असल्याचे संघटनेने निदर्शनास आणले. अनेक संस्थांनी '१०१' दाखले आणि '१३८' अंतर्गत दाखल केलेल्या प्रकरणांची खाते–निहाय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि संबंधित संस्थांचे परवाने तात्काळ रद्द करावेत, अशी मागणी करण्यात आली.

कान्हूर पठार येथील एका पतसंस्थेने बोगस कर्जपुरवठा केल्याचा आरोपही संघटनेने केला. तसेच सावेडी येथील जमिनीवरील ५९ गुंठे क्षेत्रावर एकाच दिवशी दोन संस्थांकडून तारण बोजा दाखल केल्याचा गंभीर प्रकार घडल्याचे सांगत यामध्ये निबंधक, तलाठी व सर्कल यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या प्रकरणात संस्थेचे संचालक मंडळ व व्यवस्थापक यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करून संस्थेचा परवाना रद्द करण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय काही संस्थांकडून संस्थेच्या नावाचा गैरवापर करून बेकायदेशीरपणे निधी व ठेवी गोळा केल्या जात असल्याचा आरोपही करण्यात आला. सहकार खात्याच्या नावावर खुलेआम निधी उभारून गुंतवणूकदारांची फसवणूक केली जात असल्याने या सर्व व्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

# एसएससी परीक्षा व बीएलओ मॅपिंगमुळे नगर जिल्ह्यातील शिक्षकांवर दुहेरी ताण

## आदेशात बदल करा; संघटनांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन


एसएससी परीक्षा आणि बीएलओ मॅपिंगच्या आदेशात बदल करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देताना शिक्षक नेत्यांचे शिष्टमंडळ.

नगर – जिल्ह्यात माध्यमिक शिक्षकांना एकाच वेळी दहावीच्या एसएससी परीक्षेचे कामकाज आणि बीएलओ मॅपिंगची जबाबदारी देण्यात आल्याने शिक्षकांपुढे दुहेरी संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक नेत्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन परीक्षा कामकाज पूर्ण झाल्यानंतरच संबंधित शिक्षकांची सेवा बीएलओ कामकाजासाठी उपलब्ध करून घेण्याबाबत सुधारित आदेश देण्याची मागणी केली आहे.

जिल्ह्यात १८ फेब्रुवारीपासून माध्यमिक विद्यालयांमधून इयत्ता दहावीची एसएससी परीक्षा सुरू झाली असून या परीक्षा १८ मार्च पर्यंत चालणार आहेत. या काळात अनेक माध्यमिक विद्यालयांतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची परीक्षा सहाय्यक, परिरक्षक, पर्यवेक्षक, लिपिक, पेपर तपासनीस, मॉडरेटर अशा विविध जबाबदाऱ्यांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांवर आधीच मोठा कामाचा ताण आहे.

अशा परिस्थितीत जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून अनेक शाळांना पत्र पाठवून काही शिक्षक व कर्मचाऱ्यांना बीएलओ (बुथ लेव्हल ऑफिसर) मॅपिंग कामकाजासाठी १२ ते २२ मार्च या कालावधीत पूर्ण वेळ कार्यमुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे संबंधित शिक्षकांना परीक्षा कर्तव्य आणि बीएलओ कामकाज अशा दोन जबाबदाऱ्या एकाच वेळी पार पाडाव्या लागत असून त्यामुळे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम आणि अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील मुख्याध्यापक व शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांची भेट घेतली. दहावीच्या परीक्षांचे कामकाज पूर्ण झाल्यानंतरच संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांची सेवा बीएलओ कामासाठी उपलब्ध करून घ्यावी, असा सुधारित आदेश काढावा, अशी मागणी या शिष्टमंडळाने केली.

या वेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव संभाजी पवार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, भाजपा शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष वैभव सांगळे, अशोक आव्हाड, अविनाश विधाते, पांडुरंग जावळे, कांतीलाल खुरांगे यांच्यासह शिक्षक व बीएलओ कर्मचारी उपस्थित होते.

परीक्षा ही अत्यंत संवेदनशील प्रक्रिया असल्यामुळे या काळात शिक्षकांची उपस्थिती आणि जबाबदारी महत्त्वाची असते. त्यामुळे परीक्षा संपेपर्यंत त्यांना इतर कामकाजातून मुक्त ठेवणे आवश्यक आहे. याबाबत प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी शिक्षकांनी केली आहे.

# मानवतेच्या रक्षणासाठी आणि मध्यपूर्वेतील युद्ध तातडीने थांबवण्याच्या मागणीसाठी १९ मार्चला अहिल्यानगर शहरात दिल्ली गेटसमोर करणार ग्लोबल ब्रेन ड्रेन आंदोलन

नगर – जगभर वाढत चाललेल्या युद्ध आणि संघर्षांच्या पार्श्वभूमीवर मानवतेच्या रक्षणासाठी आणि मध्यपूर्वेतील युद्ध तातडीने थांबवण्याच्या मागणीसाठी अहिल्यानगर शहरात ग्लोबल ब्रेन ड्रेन आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. १९ मार्च रोजी दिल्ली गेट परिसरात हे आंदोलन होणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

अ‍ॅड.गवळी यांनी सांगितले की, सध्या मध्यपूर्व आणि आखाती प्रदेशात सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या युद्धामुळे मोठ्या प्रमाणावर निरपराध नागरिकांचा बळी जात असून लाखो लोकांना विस्थापित व्हावे लागत आहे. याशिवाय नैसर्गिक संपत्ती, पर्यावरण, पायाभूत सुविधा आणि मानवी विकासावरही गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

युद्धामुळे मानवी प्रगतीला मोठा धक्का बसत असून विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या माध्यम ातून निर्माण झालेली मानवी क्षमता विनाशाच्या दिशेने वळत असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर जागतिक शांततेचा संदेश देण्यासाठी आणि युद्धविरोधी भूमिका ठामपणे मांडण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.




यावेळी अ‍ॅड. गवळी म्हणाले की, युद्ध आणि संघर्षांमुळे केवळ मानवी जीवितहानीच होत नाही, तर मानवी बुद्धिमत्ता, संशोधनशक्ती आणि ज्ञानसंपत्तीचाही मोठ्या प्रमाणावर नाश होतो. जगातील वैज्ञानिक, तंत्रज्ञ आणि बुद्धिजीवी वर्गाने निर्माण केलेली प्रचंड क्षमता युद्धासाठी वापरली जात असल्यामुळे मानवजातीच्या विकासाला मोठा अडथळा निर्माण होतो. मानवी बुद्धिमत्ता आणि विज्ञान हे विनाशासाठी नव्हे, तर मानवकल्याणासाठी वापरले गेले पाहिजे. युद्धामुळे होणारा ज्ञानसंपत्तीचा नाश म्हणजेच 'ग्लोबल ब्रेन ड्रेन' होय, असे त्यांनी स्पष्ट केले.

मानवजातीचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी संपूर्ण जगाने विवेकाधारित आणि जबाबदार जागतिक शासनव्यवस्था स्वीकारणे आवश्यक असल्याचे अ‍ॅड. गवळी यांनी सांगितले. त्यांच्या मते, आजच्या काळात केवळ आर्थिक किंवा तांत्रिक प्रगती पुरेशी नाही. मानवतावादी मूल्ये, ज्ञान, विवेक आणि जबाबदार निर्णयप्रक्रिया यांवर आधारित ग्लोबल रीकॉन्शिओ गव्हर्नन्स निर्माण झाल्यासच युद्ध आणि संघर्षांवर दीर्घकालीन नियंत्रण मिळवता येईल.

या आंदोलनात अशोक सब्बन, जालिंदर बोरुडे, प्रकाश थोरात, शाहीर कान्हू सुंबे, वीरबहादूर प्रजापती, अशोक भोसले, रईस शेख, विठ्ठल सुरम आदी पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसद तसेच विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहितीही अ‍ॅड. गवळी यांनी दिली. शहरातील नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होऊन जागतिक शांततेच्या संदेशाला बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# व्यवसायातील २८ लाखांची फसवणूक आणि मारहाण प्रकरणी पोलिस उपअधीक्षकांमार्फत फेर चौकशीचे न्यायालयाचे आदेश

नगर – शहरातील स्काय इन वॉटर बॉटल व्यवसायातील वादातून दाखल झालेल्या मारहाण व फसवणूक प्रकरणात न्यायालयाने महत्त्वाचा आदेश देत तपास पुन्हा करण्याचे निर्देश दिले आहेत. मूळ फिर्यादी नितीन दिपके यांच्या अर्जावर सुनावणी करत अतिरिक्त सत्र न्यायाधीश एम. एस. लोणे यांनी हा आदेश दिला असून या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी (डीवायएसपी) दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आरोपी आदित्य शिंदे आणि इतरांनी फिर्यादी नितीन दिपके यांना मारहाण करून त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात त्यांचा जामीन या अगोदर फेटाळण्यात आला होता. आता न्यायालयाने त्यांना दुसरा दणका दिला आहे. त्यामुळे नितीन दिपके यांना दिलासा मिळाला आहे.

अहिल्यानगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या सी.आर. नं. ४००/२०२५ या गुन्ह्यात फिर्यादी नितीन दिपके यांनी न्यायालयात अर्ज दाखल करत तपास योग्य पद्धतीने झाला नसल्याचा आरोप केला होता. या अर्जावर सुनावणी करत न्यायालयाने तपासात अनेक त्रुटी असल्याचे नमूद करत तपास करण्याचे आदेश दिले.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपी आदित्य विजय शिंदे व इतरांनी त्यांच्यावर लाकडी ओंडका व लोखंडी रॉडने हल्ला केला तसेच जातीवाचक शिवीगाळ केली. याशिवाय स्काय इन वॉटर बॉटल विक्रीच्या संयुक्त व्यवसायातून त्यांची सुमारे २८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

न्यायालयाने दिलेल्या निरीक्षणात तपास अधिकाऱ्याने शस्त्रे जप्त करण्याचा कोणताही ठोस प्रयत्न केलेला नसल्याचे तसेच तपास केवळ औपचारिक स्वरूपाचा झाल्याचे नमूद केले आहे. सरकारी रुग्णालयाचे जखम प्रमाणपत्र नोंदीवर असून त्यावरून फिर्यादीवर लाकडी ओंडका व लोखंडी रॉडने मारहाण झाल्याचे स्पष्ट होत असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने पुढील तपास डीवायएसपी दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत करून पूरक आरोपपत्र दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तपासादरम्यान वापरलेली शस्त्रे जप्त करणे, आरोपींकडून २८ लाख रुपयांची वसुली, भागीदारीचे मूळ कागदपत्रे आणि आरोपींची बँक स्टेटमेंट ताब्यात घेणे आदी मुद्द्यांचा सखोल तपास करण्याची गरज असल्याचेही फिर्यादीने अर्जात नमूद केले होते. दरम्यान, या प्रकरणात आरोपींनी जामिनासाठी केलेला अर्ज यापूर्वी न्यायालयाने फेटाळला असल्याने आता आरोपींची अटक अटळ मानली जात आहे. मूळ फिर्यादी नितीन दिपके यांच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ अभिजीत पूप्पाल यांनी न्यायालयात बाजू मांडली. न्यायालयाच्या आदेशानंतर आता या प्रकरणाचा तपास नव्याने सुरू होणार असून सत्य बाहेर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने भिंगारमधील दलित वस्ती बेकायदेशीर विकण्याचा घाट!

## तर २४ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'बेमुदत धरणे आंदोलन' छेडले जाईल

नगर – महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने मौजे भिंगार येथील अधिकृत दलित वस्ती बेकायदेशीररीत्या विकण्याचा घाट घातला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गेल्या अनेक दशकांपासून येथे वास्तव्यास असलेल्या शेकडो कुटुंबांना बेघर करण्याचा हा डाव असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे आणि रहिवाशांनी केला आहे.


महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने भिंगारमधील दलित वस्ती बेकायदेशीर विकण्याचा घाट घातला जात असून याबाबत निवेदन देताना जिल्हाध्यक्ष योगेश साठे.

ही वस्ती 'अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास आराखडा (२०१८–१९ ते २०२२–२३)' मध्ये नोंदणीकृत असून तिचा सांकेतांक ११–०१–००३ असा आहे. येथे रस्ते, पाणी आणि नागरी सुविधांसाठी शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च झाला आहे. अनेक रहिवाशांना याच जागेवर शासनाने अधिकृत 'घरकुल' मंजूर केली आहेत. इतके भक्कम पुरावे असतानाही, उपविभागीय अधिकारी कार्यालयाने ही जागा 'रिकामी शेतजमीन' असल्याचे भासवून विक्रीला परवानगी दिलीच कशी? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

वंचित बहुजन आघाडीने या प्रकरणाची दखल घेतली असून, जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारींनी स्वतः या जमिनीचा पंचनामा करावा आणि बेकायदेशीर विक्री परवानगी तात्काळ रद्द करावी, अशी मागणी केली आहे. याप्रसंगी जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, भिंगार अध्यक्ष राजीव भिंगारदिवे, जिल्हा सल्लागार जे. डी. शिरसाठ, प्रवीण घाटविसावे, राजू भोसले, राहुल गायकवाड, अशोक पवार, जितिन ओहोळ, तुषार धावडे, अशोक सकट, शफी मोगल, जावेद पटेल, सचिन पगारे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

जर १० दिवसांच्या आत प्रशासनाने या विक्री व्यवहारावर स्थगिती दिली नाही, तर २४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'बेमुदत धरणे आंदोलन' छेडले जाईल, असा इशारा रहिवासी आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे.

# कौडगाव सांडवा दुरुस्ती निविदा तसेच इतर कामांच्या चौकशीची मागणी

नगर – नगर तालुक्यातील कौडगाव येथील सांडवा दुरुस्तीच्या कामाच्या निविदा तसेच इतर ऑफलाईन व ऑनलाईन झालेल्या निविदांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी राहुल माने यांच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबत राहुल माने यांनी कुकडी पाटबंधारे क्रमांक दोन श्रीगोंदा यांचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले आहे. सदर कामांची चौकशी करण्यासाठी उपोषण करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

नगर तालुक्यातील कौडगाव येथे सांडवा दुरुस्ती व इतर कामाच्या अनुषंगाने निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. कंत्राटदारांनी निविदा दाखल केल्या होत्या. त्यातील निविदा अपात्र करताना चुकीचे निकष लावण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. याबाबत कुकडी सिंचन मंडळाचे पुणे येथील अधीक्षक अभियंता यांच्याशीही पत्रव्यवहार करण्यात आला असून सदर बाबीचा पाठपुरावा करण्यात येणार आहे.

सदर कामासाठी भरलेली निविदा शुल्लक कारणास्तव अपात्र करण्यात आली आहे. कोणतीही नोटीस न पाठवता निविदा अपात्र करण्यात आली. तसेच सदर कामासाठी पात्र करण्यात आलेल्या ठेकेदाराकडे नूतन व्यावसायिक कर प्रमाणपत्र पण नाही. तरीदेखील त्यांना पात्र करण्यात आले आहे असा आरोप करण्यात आला आहे. सदर निविदा प्रक्रियेची सखोल चौकशी करण्यात यावी तसेच संबंधित खात्या अंतर्गत मागील तीन वर्षात झालेल्या ऑनलाईन, ऑफलाइन सर्वच निविदांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा राहुल माने यांनी दिला आहे.

### सर्वच कामांची चौकशी करा !

ऑनलाइन निविदामध्ये एका कंत्राटदाराने दोन ठिकाणी सह्या केल्या होत्या. तरी देखील त्यास पात्र ठरविण्यात आले आहे. मात्र याच कारणावरून निविदा अपात्र देखील करण्यात आली आहे. एकाच खात्यामध्ये वेगवेगळा न्याय कसा. सदर निविदा प्रक्रियेची चौकशी करून दोषींवर कारवाई होण्याची गरज आहे. तसेच संबंधित खात्या अंतर्गत झालेल्या सर्वच ऑनलाइन, ऑफलाइन निविदांची चौकशी करण्यात यावी. असेही राहुल माने यांनी म्हटले आहे.

महेंद्र पेडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..

स्पेशल आमरस
400/- किलो
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
कापड बाजार, अहिल्यानगर.


ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
98222 94622 | 94220 87757
शाळा/कॉलेजमध्ये आपल्या पाल्यांच्या सुरक्षेबाबत निश्चिंत व्हा...

क्वॉलिटीत भारी.. किंमतीत कमी
पुरुषांसाठी व मोठ्या मुलांसाठी
बिगसाईज ब्रँण्डेड रेडिमेड कपडे
शर्ट,क्वाडशेट 7XL पर्यंत | टिशर्ट 6XL पर्यंत | नाईटपॅन्ट 4XL पर्यंत | जिन्स,फॉर्मल पॅन्ट 44 साईज पर्यंत
किंमत होलसेल व ऑनलाईन पेक्षा स्वस्त

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
मयुरी लेडिज मॉलच्या वर
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
शुभ मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188
Terms & Conditions Apply

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : १३ ते १८ मार्च २०२६


बॉर्डर २ 5.00 PM, 2.00 PM
धुरंदर 10.00 AM, 5.30 PM
क्रांतिज्योती विद्यालय 3.00 PM (मराठी)
ओ रोमिओ 11.30 AM, 9.30 PM
केरला स्टोरी २ 9.00 AM, 10.00 AM, 12.30 PM, 3.00 PM, 6.00 PM, 7.30 PM, 9.00 PM, 10.00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : १३ ते १८ मार्च २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



| SCREEN - 1 | SCREEN - 2 |
| --- | --- |
| ------ | द केरला स्टोरी २<br>12.00 PM (Noon)<br>3.00 PM<br>(Rs.150) |

आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

JOIN ONLY IN 4500/-
An ISO 9001 : 2015 Certified
DiSHA Computer Institute
Expert in Computer Training
MS-OFFICE, TALLY PRIME, ADV. EXCEL — 3 Month
CORELDRAW, PHOTOSHOP, CANVA — 3 Month
CAD 2D, CAD 3D, PHOTOSHOP — 3 Month
C LANG, C++, HTML — 3 Month-

ENROLL NOW...
Other Courses Also In 4500/-
Core Python | Adv Python | Core Java | Adv Java
SQL & PL SQL | Power BI With Excel | Digital marketing
Delhi Gate Branch — 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. — 9371051769
Old ST stand Branch — 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. — 9371151769
Pipeline Branch — Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. — 7447761769


Follow Us On :
बाथरुमची शोभा वाढविणारे वन पीस कमोड
तेही नवीन व्हरायटी उपलब्ध..
• ग्रॅव्हिटी
• जग्वार
• जॉन्सन
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011


पुण्यस्मरण



स्व. वासुदेवदास गोविंददास नेवासकर
संस्थापक-चंद्रा एजन्सीज्
स्व. दि. १७ मार्च १९९६
पुण्यस्मरणदिनी भावपूर्ण श्रध्दांजली
हेमंत, मिलींद व नेवासकर कुटुंबिय, अहमदनगर.
सौ. चारुशिला हेमेंद्र शहा, पुणे.
चंद्रा एजन्सीज् स्थापना १९७१


DCM SHRIRAM
Growing with trust
Fenesta
Better by Design
भारताची नंबर 1
खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड

uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Plot No.23, Industrial Estate, Kedgaon, Ahilyanagar-414005, Maharashtra.
Ph: 9860119223,9823189592


आपल्या अनमोल विचारांचा वारसा जपू निरंतर..



मा. केंद्रीय मंत्री
स्व. दिलीपजी गांधी
यांना ५व्या स्मृती दिनानिमित्त विनम्र आदरांजली

श्रीमती सरोज गांधी । श्रीमती छाया गांधी
अनिल गांधी – सौ. संगीता गांधी । स्वानंद नवसारीकर – सौ स्मिता नवसारीकर
देवेंद्र गांधी – सौ. प्रगती गांधी । सुवेंद्र गांधी – सौ. दिप्ती गांधी
पंकज गांधी – सौ. पल्लवी गांधी । रविंद्र गांधी – सौ. सुरुची गांधी
कु. वेदिका, जस्विल, पलक व चि. राजवीर, ईशान, पार्थ
व्हेरा एल.ई.डी. लाईट प्रा. लि. । व्हेरा इम्पेक्स
सुवेंद्र एन्टरप्रायजेस । मनसुख मिल्क प्रा.लि.
◆◆◆ गांधी परिवार ◆◆◆

